www.rajdand.com
पुणे, मंगळवार
21.02.2023
पृष्ठ : ४ । मूल्य : ₹ ४.०० । माघ कृ.१६
/rajdandlive
Declaration No. : SDM/SR/07/2023

मराठी माणसाचा मानदंड
# राजदंड
स्थापना १९९९
मुख्य संपादक : राही भिडे



शिवजयंती निमित्त ऐतिहासिक राजधानी सातारा झाली 'शिवमय'
पान ४ वर..

# युक्रेनच्या राजधानी कीव्हमध्ये बायडेन रेल्वेने पोहोचले

**कीव्ह : वृत्तसंस्था**

**अमेरिकन राष्ट्राध्यक्ष जो बायडेन युक्रेनचे राष्ट्राध्यक्ष व्होलोदिमीर झेलेन्स्की यांच्यासोबत कीव्हच्या रस्त्यावर फिरताना दिसले. अमेरिकन राष्ट्राध्यक्ष जो बायडेन सोमवारी अचानक युक्रेनची राजधानी कीव्हमध्ये पोहोचले. ते तिथे युक्रेनचे राष्ट्राध्यक्ष व्होलोदिमीर झेलेन्स्की यांच्यासोबत दिसून आले. बायडेन यांचा हा दौरा अत्यंत धक्कादायक आहे. कारण, त्याची कुणालाही पुसटशी कल्पना नव्हती. यासंबंधीच्या वृत्तानुसार, बायडेन शनिवारी रात्री (भारतीय प्रमाणवेळेनुसार रविवारी पहाटे) प्रथम पोलंडला गेले. तेथून ते तासाभराचा प्रवास करून रेल्वेने कीव्हला पोहोचले. कीव्हमध्ये झेलेन्स्की यांनी बायडेन यांचे स्वागत केले. त्यानंतर दोन्ही राष्ट्राध्यक्ष काहीवेळ पायी कीव्हच्या रस्त्यावर फिरले.**

यासंबंधीच्या वृत्तानुसार, बायडेन यांच्या युक्रेन दौऱ्यापूर्वी या भागात स्पेशल नो-फ्लाय झोन तयार करण्यात आला होता. यावेळी अमेरिकन मिसाइल शील्ड (पॅट्रियट) ॲक्टिव्ह मोडवर ठेवण्यात आली होती. 'कीव्ह इंडिपेंडेंट'च्या वृत्तानुसार, संपूर्ण कीव्हमध्ये एक अत्यंत खास व्यक्ती राजधानीत येणार असल्याची खबर पसरली होती. बायडेन यांच्या दौऱ्यापूर्वी कीव्हला येणारे सर्वच मार्गही बंद करण्यात आले होते. बायडेन व झेलेन्स्की यांनी सेंट मायकल गोल्डन डोम्ड मोनेस्ट्रीलाही भेट दिली. तिथे दोन्ही नेत्यांनी डिप्लोमॅटिक पोज दिली.

बायडेन यांच्या या दौऱ्याचा कुणालाही थांगपत्ता नव्हता. त्याच्या दौऱ्यापूर्वी २२ मिनिटे अगोदर रशियाच्या हवाई हल्ल्याचे सायरन वाजले होते. त्यामुळे सर्वजण एकदम अलर्टवर होते. काही मिनिटातंच एक ब्लॅक शेवरले कारमध्ये बायडेन दिसून आले. येत्या ४ दिवसांतच रशियाच्या युक्रेनवरील हल्ल्याला १ वर्ष पूर्ण होणार आहे. त्यामुळे बायडेन याचा हा दौरा अत्यंत महत्त्वाचा आहे. बायडेन यांनी शनिवारीच व्हाईट हाऊसमध्ये बोलताना अमेरिका कोणत्याही स्थितीत युक्रेनला वाऱ्यावर सोडणार नसल्याचे ठणकावून सांगितले होते.

**रशियन गुप्तहेर यंत्रणा फेल, बायडेन यांच्या दौऱ्याचा सुगावाही लागला नाही**

विशेष बाब म्हणजे बायडेन यांनी पोलंडला भेट देऊन तेथील राष्ट्राध्यक्ष आंद्रेज डुडा यांची भेट घेतली. त्यानंतर काही मिनिटांतच रशियाला डिप्लोमॅटिक केबलद्वारे व्हीव्हीआयपी मूव्हमेंटमुळे कीव्हचा परिसर नो-फ्लाय झोन घोषित करण्यात आल्याची माहिती देण्यात आली. रशियाच्या गुप्तचर यंत्रणांना बायडेन कीव्हमध्ये पोहोचू शकतात याचा सुगावाही लागला नसल्याचा दावा केला जात आहे. कीव्हमध्ये युक्रेनच्या परराष्ट्र मंत्रालयासमोर बॅरिकेड्स लावण्यात आले. त्यानंतर काही मिनिटांनी बायडेन तिथे कारमधून उतरले. या भागाला सेंट



**अमेरिकन राष्ट्राध्यक्ष जो बायडेन युक्रेनचे राष्ट्राध्यक्ष व्होलोदिमीर झेलेन्स्की यांच्यासोबत कीव्हच्या रस्त्यावर फिरताना दिसले.**

मायकल गोल्डन डोम्ड मॉन्टेसरी म्हणून ओळखले जातात.

बायडेन व झेलेन्स्की यांनी सेंट मायकल कॅथेड्रल चर्चलगतच्या मेमोरिअल वॉललाही भेट दिली. त्यांनी तिथे २०१४ च्या युद्धात शहीद झालेल्या सैनिकांना श्रद्धांजली वाहिली.

**बायडेनच्या युक्रेन दौऱ्याचा अर्थ - युद्ध अजून लांबणार**

फॉरेन एक्सपर्ट व गछण चे प्रोफेसर राजन कुमार यांच्या मते, बायडेन यांनी या दौऱ्याद्वारे अमेरिका, युक्रेनच्या पाठिशी असल्याचा संदेश दिला आहे. रशियाला युरोपपासून दूर ठेवा व जर्मनीला दाबून ठेवा हे अमेरिकेची पॉप्युलर पॉलिसी आहे. आता त्यांच्या विधानावरून ते शस्त्रसंधीच्या दिशेने वाटचाल करत नसल्याचे स्पष्ट झाले आहे. रशियासोबत सद्यस्थितीत चर्चा करणे आपल्या प्रतिष्ठेला नुकसान पोहोचवणारे असल्याचे बायडेन यांना वाटत आहे. त्यामुळे रशिया व युक्रेनमधील युद्ध आणखी लांबणार असल्याचे स्पष्ट आहे.

**चीन-रशियाला स्पष्ट संदेश -युद्धात युक्रेन एकटा नाही**

बायडेन यांचा कीव्ह दौरा चीन व रशियासाठी स्पष्ट संदेश आहे. युक्रेनमधील पत्रकार यूवर नेस म्हणाले- २ दिवसांपूर्वीच बायडेन यांनी युक्रेन मुद्यावर चीन रशियाला पाठिंबा देत असल्याचे स्पष्ट केले होते. तसेच त्याची माहिती अमेरिकन जनतेलाही दिली होती. याद्वारे त्यांनी चीन व रशियाला अमेरिका कोणत्याही दबावाला बळी पडणार नसल्याचा स्पष्ट संदेश दिला होता. विशेष म्हणजे हा एक प्रकारे इराणलाही संदेश आहे. कारण, गत आठवड्यातच इराणचे राष्ट्राध्यक्ष इब्राहिम रईसी अचानक चीनच्या दौऱ्यावर गेले होते.

त्यानंतर पेंटागॉननेही या प्रकरणी इशारा दिला होता. ते म्हणाले होते - अमेरिकेत चिनी स्पाय बलून दिसणे व या प्रकरणात इराण सक्रीय झाल्यामुळे निश्चितच काहीतरी कारस्थान रचले जात आहे. असे झाले अमेरिका व नाटो त्याला चोख प्रत्युत्तर देतील.

## छ. शिवरायांनी स्वत:चे धाडस संभाजीराजेंना शिकविले

डॉ. विश्वनाथ आवड यांचे प्रतिपादन

**अकलूज : प्रतिनिधी**

राजमाता जिजाऊंनी छत्रपती शिवरायांना धाडस शिकविले, तेच धाडस छत्रपतींनी संभाजीराजांना शिकविले, असे प्रतिपादन डॉ. विश्वनाथ आवड यांनी केले.




शिवरत्न सिबीएससी आणि स्टेट बोर्ड यांचे वतीने आयोजित शिवजयंती निमीत्त छोटया दोस्तांनी शिवचरित्रापासून काय शिकावे या विषयावर ते बोलत होते.

डॉ. आवड म्हणाले की, आजच्या लहान मुलांच्या मनात धाडस बांधणे महत्वाचे आहे. त्यासाठी पालकांनी मुलांना स्वावलंबनाचे व धाडसीपणाचे धडे दिले पाहिजेत. लहान वयातच राजमाता जिजाऊ यांनी शिवरायांच्या मनात धाडस बांधले म्हणूनच म्हणून आग्राभेटीत ते लहान शंभुबाळाला एकटे सोडून आले. हा इतिहास आपण विसरता कामा नये. ते बोलताना पुढे म्हणाले कि, आजकालचे पालक आपल्या मुलांच्या बाबतीत जास्तीचे जागरूक असतात. त्यामुळे मुलांवर त्याच्या इच्छा लादण्याचा प्रयत्न होतो, परिणामी त्याच्या व्यक्तिमत्वाचा हवा तसा विकास होत नाही.

छत्रपती शिवरायाच्या जीवनातील अनेक गोष्टी छोट्या छोटया पंचकथा, दंतकथाच्या माध्यमातून सांगत त्यांनी शिवचरित्रापासुन आपण काय शिकावे हे सांगीतले. अफजलखान वधातील नियोजन, शाहिस्तेखान हल्यातील गोपनियता, पन्हाळा, पुरंदर, सिंहगडावरील बलिदान, यातुन शिवरायांनी उभारलेले सवंगडी त्याच्या साठी जिव दयायला तयार झाले होते यासाठी विविध दाखले त्यांनी दिले. आपणही आपल्या आयुष्यात शिवाजी महाराजांचा विचार घेत असताना धाडस, प्रतिकुल परिस्थितीत हार न मानणे, शक्ती पेक्षा युक्त श्रेष्ट, शांत वृत्तीने काम करा स्वताला तयार करा प्रश्न विचारा तरच आपला व्यक्तीमत्व विकास होवू शकतो.

याप्रसंगी स्कुलच्या विदयार्थी, शिक्षकांनी शिवराज्याभिषेक प्रसंगावर आधारीत नृत्य सादर करण्यात आले.

या कार्यक्रमासाठी शिवरत्न सिबीएस स्कुल व स्टेट बोर्ड, प्रिन्सिपल अल्बर्ट सर , प्रिन्सिपल बिनो मॅम, नृत्य दिग्दर्शक मनोज वर्दम व्यासपिठावर उपस्थित होते.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शिवाजी गोडसे सर , रोहित देशमुख सर, श्रीकांत जाधव सर, सचिन शिंदे सर, बाळू रणनवरे सर, अक्षय लावंड सर, संदेश जवंजाळ सर, आशिकी चिंतामणी मॅडम, रमजान पठाण सर, राजकिरण माने सर यांनी सहकार्य केले.

## बागेश्वर धाममध्ये आलेल्या १० वर्षीय मुलीचा मृत्यू

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

बागेश्वर धामचे महंत धीरेंद्र शास्त्री यांच्या दरबारात गेलेल्या एका १० वर्षीय मुलीचा रविवारी मृत्यू झाला. राजस्थानमधील बाडमेर येथील कुटुंबीय त्यांच्या मुलीला मिर्गीचा त्रास होत असल्याने तिच्यावर उपचार करण्यासाठी बागेश्वर धाममध्ये आले होते. पंडित धीरेंद्र शास्त्री यांनी मुलीला विभूती दिली. मात्र, तिचा जीव वाचला नाही. असे कुटुंबीयांचे म्हणणे आहे. त्यानंतर बागेश्वर धामच्या बाबांनी कुटुंबीयांना मुलीला घेवून जाण्यास सांगितले.

मिळालेल्या माहितीनुसार, विष्णू कुमारी असे मृत १० वर्षीय मुलीचे नाव आहे.

## शिक्षणशास्त्र महाविद्यालयांच्या कर्मचाऱ्यांचे आजपासून मुंबईत धरणे

### डॉ. मेघा गुळवणी यांची माहिती

**मायणी : प्रतिनिधी**

राज्यातील २००१ पूर्वीच्या शिक्षण शास्त्र महाविद्यालयांचा बीएड अनुदान मिळण्याचा मार्ग अद्यापी मोकळा झालेला नाही. परिणामी नोव्हेंबर २००१ पूर्वीच्या शिक्षण शास्त्र महाविद्यालयातील प्राचार्य, प्राध्यापक व प्रशासकीय कर्मचारी मंगळवार दिनांक २१ फेब्रुवारीपासून मुंबईच्या आझाद मैदानावर बेमुदत धरणे आंदोलन करणार असल्याची माहिती विनाअनुदानित शिक्षण संस्था महाविद्यालय प्राचार्य ,प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी असोसिएशनच्या अध्यक्षा, शिक्षणशास्त्र महाविद्यालय विट्याच्या संस्थापक व प्राचार्या डॉ. सौ. मेघा विश्राम गुळवणी यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे दिली.

यासंदर्भात प्रसिद्धी पत्रकात दिलेली माहिती अशी - शिक्षकांचे शिक्षक उपाशी अशीच काहीशी परिस्थिती शिक्षण शास्त्र महाविद्यालयातील शिक्षकांची झाली आहे. एक गुणवत्तापूर्ण व आदर्श शिक्षक घडविण्याचे कार्य या महाविद्यालयांमार्फत केली जाते.



आजच्या जागतिकीकरणाच्या युगामध्ये व नवीन शैक्षणिक धोरणानुसार एक दर्जेदार कौशल्यपूर्ण शिक्षक घडावा यासाठी शासन प्रयत्नशील आहे ,परंतु या शिक्षकांना घडविणाऱ्या शिक्षकांच्या शिक्षकांकडे शासनाचे नेहमीच दुर्लक्ष असून २००१ पूर्वीच्या शिक्षण शास्त्र महाविद्यालयांना अजून कोणत्याही प्रकारचे अनुदान शासनाकडून दिले गेलेले नाही. ही महाविद्यालये आजही दुर्लक्षित अवस्थेत आहेत.

मागील वर्षी सर्व शिक्षण शास्त्र महाविद्यालयांच्या तपासण्या होऊन संचालक कार्यालयाद्वारे अहवाल मंत्रालय शिक्षण विभाग, मुंबई येथे पोहोचलेले आहेत. परंतु या बाबतीत कार्यवाही मात्र रखडलेली आहे .गेल्या अनेक वर्षांपासून व सद्यस्थितीमध्ये मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, उच्च शिक्षण मंत्री यांना वारंवार निवेदन देऊनही या प्रश्नावर शासन स्तरावर अद्याप कोणतीही कार्यवाही झाली नाही फक्त आश्वासनेच दिली गेली आहेत.

डॉ. मेघा गुळवणी पत्रकात पुढे म्हणतात, अनुदान मागणारी सर्व महाविद्यालये जुनी असून त्यातील प्राचार्य ,प्राध्यापक व प्रशासकीय कर्मचारी सेवानिवृत्तीच्या मार्गावर आहेत. इतकेच नव्हे तर गेल्या पाच वर्षात काहीजण सेवानिवृत्त झाले आहेत. समान काम समान दाम या घटनेच्या तत्वानुसार इच्छा असूनही यातील कर्मचाऱ्यांचे आर्थिक समाधान करणे अशक्य होते. या महाविद्यालयातील सर्व कर्मचारी आर्थिक हलाखीचे जीवन जगत आहेत. या सर्व समस्या शासन दरबारी आम्ही सातत्याने मांडत आलो आहोत.

सन २००१ पूर्वीची राज्यात एकूण ९० महाविद्यालये आहेत. राज्य शासनाने या महाविद्यालयांना शंभर टक्के अनुदान द्यावे अशी आमची मागणी आहे. त्यासाठी राज्य शासनाच्या तिजोरीवर फार मोठा भार पडणार नाही हे आम्ही शासनाला वारंवार पटवून दिले आहे. खासदार धैर्यशील माने व उच्चतंत्र शिक्षण मंत्री ना.चंद्रकांत पाटील यांच्या समवेत संघटनेने एकत्रित भेटून चर्चा करून निवेदने ही दिली आहेत. त्यांनीही अनुदानाबाबत सकारात्मकतेची भूमिका घेतली आहे. तरी येत्या आर्थिक अधिवेशनात शंभर टक्के अनुदानाची शासनाने तरतूद करावी म्हणून सदर २००१ पूर्वीच्या सर्व शिक्षण शास्त्र महाविद्यालयांना अनुदान मंजूर व्हावे यासाठी सरकारचे लक्ष वेधून घेण्याच्या हेतूने संघटनेमार्फत आझाद मैदान मुंबई येथे मंगळवार दिनांक २१ फेब्रुवारी पासून धरणे आंदोलन करण्यात येत आहे.

## छत्रपती शिवरायांना राजधानी शाहूनगरीचा मानाचा मुजरा

**सातारा : प्रतिनिधी**

राजधानी शाहूनगरीने रविवारी शिवजयंतीनिमित्त साक्षात शिवकाळ अनुभवला. पोवाडे तुताऱ्यांचा नाद, शाही मिरवणूक, महाआरती अशा विविध कार्यक्रमातून सातारा शहरासह जिल्ह्यात शिवजयंती पारंपारिक पद्धतीने साजरी करण्यात आली. चौकाचौकात उभारलेल्या भगव्या स्वागत कमानी भगव्या पताका भगवे फेटे घातलेले मावळे भगवे झेंडे घेऊन शिवज्योती बरोबर राहणारे शिवभक्त अशा जल्लोषपूर्ण वातावरणामुळे शाहू नगरी अक्षरश: शिवमय झाली होती.

छत्रपती शिवाजी महाराज की जय हर हर महादेव अशा जय वर्षांनी सारासमंत रुग्णांना शिवतीर्थावर आसमंत उधळून टाकणाऱ्या विद्युत रोशन यांच्या साक्षीने राजमाता कल्पनाराजे भोसले व स्वातंत्र्यवीर सावरकर यांची



नात शाहीर विनता जोशी यांच्या हस्ते महाआरती करण्यात आली. शिवेंद्रजी मित्र समूहाच्या वतीने देखील राजधानी महोत्सव उपक्रमांतर्गत महाआरतीचा आयोजन करण्यात आले होते दोन्ही आरत्या आणि शाही मिरवणुका यामुळे शिवतीर्थावर अलोट गर्दीचा सागर उसळला होता राजधानी सातारा किल्ले प्रतापगडासह संपूर्ण जिल्ह्यामध्ये शिवरायांच्या नावाचा गजर ऐकावयास मिळत होता करोनाच्या निर्बंधाचे कटू स्मृती मागे ठेवून शिव मावळ्यांनी आजची शिवजयंती मोठ्या उत्साहात साजरी केली रात्री बारा वाजल्यापासूनच शिवज्योती साताऱ्यात दाखल व्हायला सुरुवात झाली होती राजवाडा तसेच पोय नाक्यावरील छत्रपती शिवाजी महाराज पुतळा परिसर आकर्षक विद्युत रोशन निघाला किल्ले अजिंक्यतारा येथून पोळी नाका येथे शिवजोत आणण्यात आली शिवतीर्थावरील छत्रपती शिवरायांच्या पुतळ्याचा अभिवादन करण्यासाठी दिवसभर शिवभक्तांची रांग लागली होती आमदार शिवेंद्रसिंहराजे भोसले मित्र समूहाच्या वतीने राजवाडा ते पोहे नाका यादरम्यान शाही मिरवणूक काढण्यात आली होती हत्ती घोडे मावळे शिंद तुताऱ्या अशा शाही वातावरणामुळे साक्षात शिवकाळाचा अनुभव राजधानी शाहू नगरीने घेतला या शाही मिरवणुकीमध्ये हजारो मावळे सहभागी झाले होते स्वतः आमदार शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी सुद्धा या मोहिमेत उत्पन्न सहभाग घेतला यावेळी पोलीस अधीक्षक समीर शेख हे सुद्धा उपस्थित होते.

येथील प्रतापगडावर सुद्धा सातारा जिल्हा परिषदेच्या वतीने शिवजयंतीनिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते शहरासह जिल्ह्यात विविध सार्वजनिक मंडळांनी राजगड रायगड शिवनेरी प्रतापगड वराड गड सिंहगड अजिंक्यतारा पन्हाळगड विशाळगड मुरुड जंजिरा सज्जनगड पुरंदर यासह शिवस्पर्शाने पावन झालेल्या विविध किल्ल्यावरून शिवज्योत दवडीचे आयोजन करण्यात आले होते पवई नाक्यावर जाणीव सामाजिक संस्थेच्या वतीने सर्व शिवज्योतींचे स्वागत करण्यात येऊन त्यांच्या अल्पोपहाराची सोय करण्यात आली होती शिवपराक्रमाची गाथा सांगणारे पोवाडे व्याख्याने यासह विविध सामाजिक उपक्रम थाटात राबवण्यात आले जिल्हा पोलीस प्रशासनाच्या वतीने कायदा सुव्यवस्था राखण्यासाठी सातारा शहरासह जिल्ह्यात चूक पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता.

## महादरे तलावाच्या पाण्याला राजकीय संघर्षाची धार; अज्ञाताने वॉल्व हलवल्याने लाखो लिटर पाणी वाया

### फेब्रुवारीतच तलाव रिकामा करण्याचे षड्यंत्र? या ठिकाणी नेमणुकीस असणारा नगरपालिका कर्मचारी काय करतोढ? नागरिकांची चौकशीची मागणी

**सातारा : प्रतिनिधी**

मोरे कॉलनी, व्यंकटपुरा पेठेसह शहराच्या पश्चिम भागाला पाणीपुरवठा करणाऱ्या महादरे तलावाचा तीस फूट खोलीवर असणारा व्हॉल्व अज्ञाताने खुला करून ठेवल्याने महादरे तलावाचे तब्बल ३० लाख लिटर पाणी वाया गेले आहे. ऐन फेब्रुवारीत हा तलाव रिकामा झाल्याने मोरे कॉलनीसह लगतच्या परिसरातील नागरिकांना तीव्र पाणी टंचाईचा सामना करावा लागणार आहे. या व्हॉल्व प्रकरणाला सातारा नगरपालिकेचा शैलेश गवई या कर्मचाऱ्याने थेट मुख्याधिकाऱ्यांना पत्र लिहून या प्रकरणाला वाचा फोडली आहे.

दि १७ फेब्रुवारी रोजी पालिकेला प्राप्त झालेल्या पत्रात नमूद केले आहे की महादरे तलावाच्या शेजारी ३० फूट





खोल असणाऱ्या डबीमध्ये असणारा व्हॉल्व अज्ञाताकडून हलवण्यात आल्याने तलावाचे पाणी ओढ्यातून निघून गेले असून तलावातील पाण्याची पातळी केवळ तीन फूट राहिली आहे ही टंचाई नैसर्गिक नसून अज्ञाताने हा व्हॉल्व सोडल्याचे स्पष्ट झाले आहे. या पत्रामुळे मुद्दाम पाणीटंचाई निर्माण करून नागरिकांना वेठीस धरण्याचा प्रकार समोर आल्याने संतापाचे वातावरण निर्माण झाले आहे सातारा शहरातील मंगळवार तळे परिसर हा तसा निवासाच्या दृष्टीने शांत आहे मात्र कृत्रिम पाणी टंचाई निर्माण करण्यात कोणाला स्वारस्य आहे असा प्रश्न विचारला जात आहे. महादरे तलावामध्ये तब्बल ५५ लाख दशलक्ष लिटर पाणीसाठा असतो हे पाणी जवळपास जून अखेरपर्यंत मोरे कॉलनी, व्यंकटपुरा, मतकर कॉलनी तसेच लगतच्या परिसरामध्ये पुरते या तलावाची पाणी पातळी तब्बल ४५ फूट असते मात्र या तलावाच्या अचानक पाणी कमी होण्यामागचे कारण हे नैसर्गिक नसून कृत्रिम असल्याची गंभीर बाब पालिकेच्या कर्मचाऱ्याने पाणीपुरवठा विभागाच्या निदर्शनास आणून दिली कोणीतरी मुद्दाम हा तलावाचा वॉल खुला सोडून दिल्याने सर्व पाणी लगतच्या ओढ्यातून वाहून गेल्याचे समोर आले आहे. या विषयावर राजकीय प्रतिक्रिया उमटण्यास सुरुवात झाली आहे. दोनच दिवसापूर्वी माजी नगरसेवक अविनाश कदम हे व्यंकटपुरा पेठेतील नागरिकांचा पाणी कमी येते म्हणून मोर्चा घेऊन गेले होते. या प्रकरणाची पाणीपुरवठा विभागाने कोणतीही गंभीर दखल म्हणावी तशी घेतली नाही. मुद्दाम केलेल्या तांत्रिक चुकांमुळे

**सातारा विकास आघाडीचे या भागातील नगरसेवक वसंत लेवे यांच्याशी संपर्क साधला असता ते म्हणाले महादरे तलावाचे पाणी ३० जून पर्यंत पुरते हा गेल्या कित्येक वर्षाचा अनुभव आहे इलेक्शन डोळ्यासमोर ठेवूनच विरोधकांनी मुद्दाम पाण्याची गळती घडवून आणली त्यामुळे पश्चिम भागातील नागरिक विनाकारण वेठीला धरले गेले आहेत. जे म्हणतात पाणी टंचाईमुळे नागरिकांना फुलपात्र भर सुद्धा पाणी मिळणार नाही त्यांना बादली बादलीने घरात नेऊन पाणी देणार आहे. ज्यांना आमच्या कामाविषयी डोळ्यात माती पडते त्यांनी खुलेपणाने निकोप पद्धतीने समोरासमोरचा संघर्ष करावा अशी अंधारातील कृत्ये करू नयेत. जाणीवपूर्वक पाणीटंचाई निर्माण करून लोकांची सहानभूती मिळवण्याचा प्रकार केवळ हास्यास्पद आहे. निवडणुका डोळ्यासमोर ठेवून हे जर होणार असेल तर त्याच्या दुप्पट ताकदीने अशा अडचणींचा मुकाबला करून विकास कामे काय असतात हे आम्ही पुन्हा एकदा दाखवून देऊ.**

आता पाणी गळतीचा संताप जनक प्रकार समोर आल्याने सातारा विकास आघाडी आणि नगर विकास आघाडी यांच्यातील विरोधाला या प्रकरणाची फोडणी मिळाली आहे या संदर्भात प्रशासक अभिजीत बापट यांनी अद्याप कोणतीही प्रतिक्रिया दिलेली नाही. यासंदर्भात अविनाश कदम यांना प्रतिक्रिया विचारले असता ते प्रतिक्रियांसाठी उपलब्ध झाले नाहीत.

# ‘लिव्ह इन’मधील मुली असुरक्षित...

**देशाच्या राजधानीत श्रद्धा वालकर हत्येच्या धर्तीवर ‘लिव्ह इन रिलेशन’चे आणखी एक खळबळजनक हत्याकांड घडल्यानंतर अशा प्रकारच्या नाते संबंधात मुली सुरक्षित आहेत का याची पुन्हा एकदा चर्चा सुरू झाली आहे. तसेच अशा नात्यांतून खूनाच्या अनेक घटना घडूनही हे प्रकार वाढत आहेत यावरून पाश्चिमात्य संस्कृतीचा प्रसार भारतात वेगाने होत आहे का असेही प्रश्न विचारले जात आहेत.**

मुंबईतील श्रद्धा वालकर हिचे ३५ हून अधिक तुकडे करून ते फ्रीजमध्ये ठेवण्यात आले. त्यानंतर तिचे तुकडे इतस्ततः फेकण्यात आले. त्यातील क्रौर्याची परितसीमा पाहून देश संतप्त झाला. ‘लिव्ह इन’ मध्ये राहणाऱ्या आफताबवर गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. त्याच्याविरोधात आरोपपत्रही दाखल झाले आहे. श्रद्धा वालकरनंतर हरियाणातील निक्की यादव, पालघरमध्ये मेघा अशी अनेक प्रकरणे उघडकीस येत असून, देशाच्या दृष्टीने ही बाब चिंताजनक आहे. गेल्या आठवड्यात श्रद्धा प्रकरणासारखे आणखी एक प्रकरण दिल्लीत घडले. या प्रकरणातील आरोपीनेही आपल्या ‘लिव्ह-इन पार्टनर’ची हत्या केल्यानंतर तिचा मृतदेह फ्रीजमध्ये लपवून ठेवला. २३ वर्षीय निक्की यादवचा मृतदेह १४ फेब्रुवारीला ‘व्हॅलेंटाइन डे’च्या दिवशी तिचा प्रियकर साहिल गेहलोतच्या कुटुंबाच्या मालकीच्या रेस्टॉरंटमधील फ्रीजमध्ये सापडला. निक्की आणि साहिल बरेच दिवस ‘लिव्ह-इन पार्टनर’ म्हणून राहत होते. हत्येतील आरोपी २४ वर्षीय साहिल गेहलोत याला पोलिसांनी अटक केली आहे. साहिलने दुसऱ्या महिलेशी लग्न केल्याने नऊ फेब्रुवारी रोजी दोघांमध्ये सुमारे तीन तास भांडण झाल्याचे सांगण्यात येते. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, भांडण वाढत असताना साहिलने मोबाईल चार्जिंग केबल वापरून निकीचा गळा दाबला. हत्येनंतर त्याने निकीचा मृतदेह आपल्या कारमध्ये घेतला आणि दहा फेब्रुवारी रोजी हरियाणातील मित्राव या गावी पोहोचला. तिथे मृतदेह त्याच्या कुटुंबीयांच्या एका ढाब्यातील मोठ्या फ्रीजरमध्ये ठेवण्यात आला. आश्चर्य म्हणजे त्याच दिवशी त्याने दुसऱ्या महिलेशी लग्न केले. हे नाते त्याच्या कुटुंबीयांनीच जुळवले होते. वास्तविक त्याच्या नातेवाइकांनीही त्याला या प्रकरणात सकृतदर्शनी साथ दिल्याचे दिसते. एक तरुण त्याच्या प्रेयसीचा खून करतो, मृतदेह गाडीत घालून आणतो, ढाब्यावरच्या फ्रीजमध्ये ठेवतो आणि दुसऱ्या मुलीशी लग्नही करतो. त्याला कुणी अडवत नाही, हे कशाचे लक्षण आहे? ही विकृती कोणी आणि कशी पोसली? पाश्चात्य संस्कृतीचा विपर्यास करून आणि भारतातील पुरूषप्रधान मानसिकतेचा अतिरेक होऊन तर तरूण मुले हे धाडस करीत नाहीत असा प्रश्न पडतो. अशा अतिरेकी गुन्हेगाराला पाठिशी घालण्याचे प्रकारही कुटुंबियांकडून होतात हे कशाचे लक्षण आहे? एका प्रकरणातील मुलगा मुस्लिम तर दुसऱ्या प्रकरणातला हिंदू असल्याने ‘लव जिहाद’ म्हणून या प्रकरणाचे भांडवल करण्याची संधी नाही, त्यामुळे कथित संस्कृतीरक्षक त्यापासून दूर राहिले असावेत. हिंदी चित्रपटात जसे कायद्याचे हात लांब आहेत, असे दाखवले आणि सांगितले जाते, तसे यादव प्रकरणात घडले. गेल्या दोन दशकात आपल्या देशात ‘लिव्ह-इन रिलेशनशिप कल्चर’ची झपाट्याने झालेली वाढ आश्चर्यकारक तसेच चिंताजनक आहे. काही महानगरे सोडली तर अशा नातेसंबंधांना अद्याप पूर्ण सामाजिक मान्यता मिळालेली नाही, तरीही हा प्रकार स्वीकारण्याची क्रेझ तरूणाईत वाढत आहे.

नोकरदार महिलांमध्ये ‘रिलेशनशिप’ झपाट्याने वाढली आहे, याचे मुख्य कारण हे असावे की यामध्ये लग्नासारखे कोणतेही बंधन नाही आणि दोघांनाही स्वतः च्या मर्जीने जगण्याचे स्वातंत्र्य मिळते. स्वातंत्र्याची सुरुवात एका लढ्याने होते; परंतु त्याचा शेवट एका मोठ्या गुन्ह्याने होतो आणि पुरूषप्रधान मानसिकतेचे बळी मुलीच ठरतात. २०१८ मध्ये याबाबत एक सर्वेक्षण करण्यात आले. या सर्वेक्षणात सहभागी असलेल्या ८० टक्के लोकांनी ‘लिव्ह-इन रिलेशनशिप’चे उघडपणे समर्थन केले. त्यांनी असे राहणे चुकीचे मानले नाही. यापैकी २६ टक्के लोकांनी संधी दिल्यास तेही ‘लिव्ह-इन रिलेशनशिप’मध्ये राहण्यास प्राधान्य देतील, असे म्हटले होते. फिलीपिन्स, फ्रान्स, कॅनडा, ऑस्ट्रेलिया, स्कॉटलंड, ब्रिटन, अमेरिका अशा डझनभर देशांमध्ये ‘लिव्ह-इन रिलेशनशिप’ला वेगवेगळ्या कायदेशीर परिभाषेत मान्यता असली तरी, आपल्या देशात ‘लिव्ह-इन रिलेशनशिपमध्ये राहणे हा गुन्हा नाही. सर्वोच्च न्यायालय आणि इतर न्यायालयांच्या निर्णयांनी एक प्रकारे ‘लिव्ह इन रिलेशनशिप’ला कायदेशीर मान्यता दिली आहे. सर्वोच्च न्यायालयाने आपल्या निर्णयाद्वारे अशा संबंधांची कायदेशीर स्थिती स्पष्ट केली आहे. २००६ च्या एका खटल्यात निर्णय देताना सर्वोच्च न्यायालयाने म्हटले होते, की प्रौढ झाल्यानंतर व्यक्ती कोणाशीही राहण्यास किंवा लग्न करण्यास स्वतंत्र असते. त्या निर्णयामुळे ‘लिव्ह इन रिलेशनशिप’ला कायदेशीर मान्यता मिळाली. काही लोकांच्या दृष्टीने हे 'अनैतिक' समजले जात असले तरी, अशा रिलेशनशिपमध्ये राहणे हा ‘गुन्हा’ नाही, असे न्यायालयाने म्हटले आहे. जर ‘लिव्ह-इन रिलेशनशिप’मध्ये एखादे अपत्य जन्माला आलेले असेल, तर सर्वोच्च न्यायालयाने आदेश दिला आहे की, विवाह कायद्याप्रमाणेच या मुलावरील अधिकारांचा निर्णय घेतला जाईल; मात्र विवाहित व्यक्ती घटस्फोटाशिवाय एखाद्यासोबत ‘लिव्ह-इन’मध्ये राहिली, तर ती बेकायदेशीर मानली जाते; पण दोन वर्षांपूर्वी पंजाब-हरियाणा उच्च न्यायालयाने एका प्रकरणात निर्णय दिला होता की, विवाहित असूनही ‘लिव्ह-इन’मध्ये राहणे हा गुन्हा नाही आणि त्या पुरुषाने घटस्फोटाची प्रक्रिया सुरू केली की नाही हे महत्त्वाचे नाही; पण आजही ‘लिव्ह-इन रिलेशनशिप’मध्ये राहणाऱ्या लोकांकडे समाजात चांगल्या नजरेने पाहिले जात नाही, हे सत्य आहे. अशा ‘रिलेशनशिप’मध्ये राहणाऱ्या मुलींच्या चारित्र्यावर अनेकदा प्रश्न उपस्थित केले जातात. राजस्थान उच्च न्यायालयाचे माजी न्यायमूर्ती शिवकुमार शर्मा म्हणतात की, या व्यवस्थेसाठीही कायदा असायला हवा. लग्नाप्रमाणे ‘लिव्ह-इन’चीही नोंदणी झाली पाहिजे, संबंध तोडताना कायदेशीर प्रक्रियेतून जाणे आवश्यक आहे.

स्थित्यंतर



राही भिडे
मो. ९८६७५२१०४९
rahibhide@gmail.com

एका अभ्यासानुसार, भारतात सर्वाधिक ‘लिव्ह-इन’ केसेस बंगळूरूमध्ये आहेत. बंगळूर हे आयटी उद्योगाचे सर्वात मोठे केंद्र आहे. देशातील सर्व राज्यांतील तरुण तिथे वेगवेगळ्या कंपन्यांमध्ये काम करत आहेत. दोघांना एकमेकांबद्दल प्रेम वाटले की ते एकत्र राहतात. त्यामुळे लग्नाअगोदरच्या शारीरिक संबंधांच्या केसेसमध्येही वाढ होत आहे. परिणामी लग्नाशिवाय गरोदर राहण्याच्या घटनांमध्येही झपाट्याने वाढ झाली आहे. बहुतेक ‘लिव्ह-इन रिलेशनशिप’मध्ये जेव्हा दोघांमध्ये थोडे काही बिघडले, तर मुली आपल्या जोडीदाराला बलात्काराचा गुन्हा दाखल करण्याची धमकी देतात. अशा परिस्थितीत तिच्या जोडीदाराला भीतीपोटी एकतर तडजोड करणे बरे वाटते किंवा तिला खून करून कायमचे शांत केले जाते. आपण कितीही आधुनिक झालो असलो, तरी ‘लिव्ह-इन रिलेशनशिप’कडे आपल्या समाजात वाईट नजरेने पाहिले जाते. लग्नापूर्वी मुलगा आणि मुलगी स्वेच्छेने पती-पत्नीसारखे एकाच छताखाली राहणे याला ‘लिव्ह-इन रिलेशनशिप’ म्हणतात. काही कायदेशीर नियम फक्त ‘रिलेशनशिप’मध्ये राहणाऱ्या दोन लोकांसाठी बनवले गेले आहेत. विवाहित जोडप्याप्रमाणे, ‘लिव्ह-इन रिलेशनशिप’मध्ये राहणाऱ्या जोडप्यांना काही नियम लागू होतात, ज्याचा वापर करून ते फसवणूक आणि समाजाच्या समजुतींच्या विरोधात जाणाऱ्या सर्व मर्यादा सहज टाळू शकतात. आजच्या तरुण पिढीला ‘लिव्ह इन रिलेशनशिप’मध्ये राहण्यामागे अनेक कारणे सापडली असली, तरी सामाजिक वास्तव काही वेगळेच आहे. दोघे ’लिव्ह-इन रिलेशनशिप’मध्ये जोडपे म्हणून एकत्र राहत असेल, तर त्यांना विवाहित मानले जाईल. जोडीदार ‘लिव्ह-इन रिलेशनशिप’मध्ये राहण्यासोबतच गरोदर राहिली आणि तिला या मुलाला जन्म द्यायचा असेल, तर ते मूल वैध मानले जाईल. विवाहित जोडप्याप्रमाणे, त्या मुलाची काळजी घेण्याची जबाबदारी त्या जोडप्याची असेल. एवढेच नाही, तर स्त्री भ्रूणहत्या आणि गर्भपाताशी संबंधित सर्व तरतुदी ‘लिव्ह-इन रिलेशनशिप’मध्ये राहणाऱ्यांनाही लागू आहेत. विवाहित जोडप्यांप्रमाणे सर्व कायद्यांच्या सवलतींसह हवे तसे राहण्याचेही स्वातंत्र्य असताना मुलींनीच अशा विकृतांपासून स्वत:चा बचाव करायला हवा. लिव्ह इन साठी किमान वैचारीकदृष्ट्या प्रगल्भ जोडीदाराची निवड केलेली असावी.

# छत्रपतींच्या जयघोषाने... स्वानंदच्या शिवगीतांनी जिल्हा परिषद दणाणली!

**सोलापूर : प्रतिनिधी**

सर्वत्र भगवे फेटेशाहिरा्चा मर्दानी पोवाडा, अंगावर शहारे आणणारे शिवरायांच्या गीतांनी सोलापूरचे यशवंतराव चव्हाण सभागृह व छत्रपतींच्या जयघोषाने जिल्हा परिषद दणाणली.

मराठा सेवा संघ जिल्हा परिषद शाखा सोलापूर यांच्यातर्फे यशवंतराव चव्हाण सभागृह येथे शिवजयंती उत्साहात साजरी करण्यात आली. शाखेतर्फे जिल्ह्यात उल्लेखनीय कामगिरी केलेल्या विविध विभागातील कर्मचाऱ्यांना कार्यकुशल पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. जिल्हा परिषदेच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराज उद्यानातील छत्रपती शिवाजी महाराज यांचे पुतळ्यास मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप कोहिनकर यांचे हस्ते पुष्पहार घालून अभिवादन करण्यात आले. यशवंतराव चव्हाण सभागृहामध्ये छत्रपती शिवाजी महाराज यांचे प्रतिमेचे पूजन मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप कोहिनकर यांनी केले.

जिल्हा परिषदेच्या मराठा सेवा संघ शाखा व माध्यमिक शिक्षण विभाग जिल्हा परिषद सोलापूर यांचे संयुक्त विद्यमाने या कार्यक्रमाचे आयोजन करणेत आले होते. अध्यक्षस्थानी मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप कोहिनकर हे होते. मराठा सेवा संघ शाखेचे वतीने कार्यकुशल पुरस्कार वितरण सोहळा संपन्न झाला.

**पुरस्काराचे सन्मानार्थी...**

मुख्य लेखा व वित्त



अधिकारी अजयसिंह पवार, गट विकास अधिकारी मनोज राऊत (करमाळा), वैदयकिय अधिकारी डॉ. सागर मंगेडकर, शाखा अभियंता राजेश जगताप,ग्रामविकास अधिकारी पांडुरंग कागदे,ग्रामसेवक नागनाथ जोडमोटे, प्राथमिक शिक्षक अर्जुन आवताडे, वरिष्ठ सहाय्यक प्रदीप सकट , वरिष्ठ सहाय्यक (लेखा) विलास मसलकर, परिचर विरभद्र हिरजे यावेळी जेष्ठ पत्रकारांचा गौरव करणेत आला.

यावेळी उप मुख्य कार्यकारी अधिकारी जावेद शेख, प्राथमिक शिक्षणाधिकारी संजय जावीर, माध्यमिक शिक्षणाधिकारी सुलभा वठारे, कार्यकारी अभियंता पंडित भोसले , कार्यकारी अभियंता संतोष कुलकर्णी,, कार्यकारी अभियंता खराडे, कार्यकारी अभियंता सुनील कटकधोंड, कास्ट्राईब कर्मचारी संघटनेचे अरूण क्षीरसागर, अधिक्षक अनिल जगताप, लिपिक वर्गीय संघटनेचे संघटक राजेश देशपांडे, जि प कर्मचारी संघटनेचे विवेक लिंगराज, गिरीष जाधव, अधिक्षक चंद्रकांत होळकर, अधिक्षक सचिन सोनकांबळे, अध्यक्ष,संतोष जाधव,आप्पाराव गायकवाड, प्रमुख उपस्थित होते.

यावेळी स्वानंद, वडवळच्या जि. प. शिक्षकांचा वाद्यवृंद असलेला ‘‘ गर्जा महाराष्ट्र माझा’’ हा शिवगीतांचा बहारदार कार्यक्रम संपन्न झाला. ‘गर्जा जय जय महाराष्ट्र माझा’ या राज्यगीताने कार्यक्रमास प्रारंभ झाला. यामध्ये शिवचरित्रावर आधारित विविध गीते, पोवाडा यांच्या सादरीकरणाने शिवभक्तांची मने जिंकली.

सूत्रसंचालन महेश कोटीवाले यांनी केले. आभार जिल्हा कार्यक्रम व्यवस्थापक सचिन जाधव यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सचिन चव्हाण, राम जगदाळे, अनिल जगताप, सचिन जाधव, सचिन साळुंखे, प्रकाश शेंडगे, सुभाष कदम, आप्पासाहेब भोसले, विठल मलपे, संतोष शिंदे, संजय पाटील, अजित देशमुख, महेश पाटील, विशाल घोगरे, चेतन भोसले, प्रदिप सुपेकर, विकास भांगे, वासुदेव घाडगे, अविनाश भोसले, गणेश साळूंखे, सचिन पवार, उमेश खंडागळे, जयंत पाटील, महेंद्र माने, अभिजीत निचळ, ऋषिकेश जाधव, रवि पाटील, विनायक कदम, सुनिता भुसारे, आश्विनी सातपुते, अनुपमा पडवळे, भारती धुमाळ, सविता मिसाळ यांनी परिश्रम घेतले.

## मलकापूर येथून दुचाकीची चोरी

**सातारा :** मलकापूर, ता. कराड येथून दुचाकीची चोरी झाल्याची फिर्याद कराड शहर पोलीस ठाण्यात नोंदविण्यात आली आहे.

याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी, दिनांक १४ फेब्रुवारी रोजी दुपारी पाच ते संध्याकाळी आठ वाजण्याच्या दरम्यान ज्ञानेश्वर पुंडलिक सुतार यांची हिरो कंपनीची दुचाकी क्र. एमएच १२ पीडी ६३७० मलकापूर, ता. कराड येथील कृष्णा-सरिता मार्केट येथून अज्ञात चोरट्याने चोरून नेली आहे. याबाबतची फिर्याद कराड शहर पोलीस ठाण्यात नोंदविण्यात आली असून अधिक तपास पोलीस नाईक बुधावले करीत आहेत.

# ताराराणी कुस्ती केंद्राला राज्यस्तरीय स्पर्धेत चार पदके

**अकलूज : प्रतिनिधी**



माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते-पाटील, आ. रणजितसिंह मोहिते-पाटील, धैर्यशिल मोहिते-पाटील यांच्या मार्गदर्शनाने व सौ. शितलदेवी मोहिते-पाटील यांच्या व्यवस्थापनांतर्गत चालणाऱ्या शिवरत्न शिक्षण संस्था संचलित ताराराणी महिला कुस्ती प्रशिक्षण केंद्रातील ४ खेळाडूंनी राज्यस्तरीय कुस्ती स्पर्धेत चार पदके मिळविली.

दि. १२ ते १४ फेब्रुवारीदरम्यान झालेल्या या कुस्ती स्पर्धा खोपोली, रायगड येथे संपन्न झाल्या. या स्पर्धेत राज्यस्तरीय शालेय मुलींच्या कुस्ती स्पर्धेत १४ वर्ष वयोगटात वैष्णवी तोरवे ४२ किलो सुवर्णपदक, १७ वर्ष वयोगटात वेदिका शेंडे ४० किलो कास्यपदक, आकांक्षा जाधव ४६ किलो रौप्य पदक, स्नेहल पालवे ७५ किलो कांस्यपदक मिळविले. ताराराणीच्या या ४ खेळाडूंनी राज्यस्तरीय कुस्ती पदके मिळविल्याबद्दल खेळाडू व प्रशिक्षक सतपाल सर यांचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.

# आरोग्याविषयी जागरूकता निर्माण झाली पाहिजे – स्वरूपाराणी मोहिते पाटील

**अकलूज : प्रतिनिधी**

उत्तम आरोग्य हे भरपुर आयुष्याची गुरूकिल्ली असते. आरोग्य उत्तम असेल तरच कुटुंबाची आर्थिक स्थितीही चांगली राहते. आरोग्य विषयक वाढता खर्च हे कुटूंबाला कमकुवत करण्याचे मुख्य कारण आहे. त्यामुळे आरोग्य विषयक जागरूकता निर्माण झाली पाहिजे. ही जागरूकता निर्माण करण्याचे काम आरोग्य शिबीरे करत असल्याचे प्रतिपादन प्रताप क्रीडा मंडळाच्या अध्यक्षा स्वरूपाराणी मोहिते-पाटील यांनी केले.

छत्रपती शिवाजी महाराज व समाजसेवक कै. निवृत्तीराव गायकवाड यांच्या जयंती निमती द्वारकाधिश सेवाभावी संस्थेमार्पत जि. प. शाळा आनंदनगर येथे आरोग्य व रक्तदान शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी स्वरूपाराणी बोलत होत्या.



या शिबीरामध्ये मोतीबिंदु तपासणी व शस्त्रक्रिया, हृदयरोग, संधीवात, त्वचारोग, मधुमेह या आजारांची तपासणी व उपचार करण्यात आले. या शिबीराचे मिशन आयुर्वेद महाराष्ट्र राज्य, सोलापूर जिल्हा होमिओपॅथीक डॉक्टर्स संघटना, व्यसनमुक्त युवक संघ, प्राथमिक आरोग्य केंद्र, आनंदनगर, रोटरी क्लब सराटी डिलाईट, माळशिरस तालुका केमिस्ट अ‍ॅन्ड ड्रगिस्ट असोसिएशन हे सह आयोजक होते. यावेळी गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मानही व शिवव्याख्याते विक्रमसिंह मगर यांचे व्याख्यानही आयोजित करण्यात आले होते. कार्यक्रामाचे प्रास्ताविक द्वारकाधिश सेवाभावी संस्थेचे डॉ. बाळकृष्ण गायकवाड यांनी केले. या संस्थेकडून शिबीराचे हे २२ वे वर्ष आहे.

यावेळी ६७८ रुग्णांची तपासणी करण्यात आली. ९१ जणांनी रक्तदान केले. शिबीरासाठी उपसरपंच वसंतराव गायकवाड, माजी सरपंच वसंतराव जाधव, ऋषीकेश गायकवाड, राजेंद्र जाधव, संजय शिंदे, बाळासाहेब शिंदे, दिलीप यादव, बाळकृष्ण डमरे, सतीश कुंभार, गोरख गवळी, राजेंद्र सोनवणे, दादासाहेब कांबळे, विश्वनाथ निकम, रमजान मुलाणी, डॉ. प्रफुल्ल गायकवाड यांनी परिश्रम घेतले.

याप्रसंगी बाळासाहेब सरगर, बाळासो. वावरे, मुक्तार कोरबु, डॉ. श्रीकांत हेगडे, डॉ. आप्पासाहेब टेळे, राजू सोनवणे, संजय देशमुख, डॉ. अक्षय वायकर, डॉ. हर्षवर्धन गायकवाड, सचिन शिंदे, डॉ. ज्ञानदेव पवार, डॉ. सपना गांधी, डॉ. जयंत शिंदे, डॉ. विठ्ठल कवितके, डॉ. शिवाजीराव काळे, डॉ. योगेश घोगरे यांनी रूग्णांची तपासणी केली.

# दिवंगत आमदार लक्ष्मण जगताप पिंपरी-चिंचवडमध्ये सर्वाधिक विकासकामे करणारे एकमेव नेते

## प्रत्येक मत लक्ष्मणभाऊंच्या विकासाला देऊन अश्विनी जगताप आणि भाजपला एक लाखाच्या मताधिक्याने निवडून देणार; पिंपळेगुरवच्या जनतेचा निर्धार

**पिंपरी : प्रतिनिधी**

दिवंगत आमदार लक्ष्मण जगताप हे पिंपरी-चिंचवडमध्ये सर्वाधिक विकासकामे करणारे एकमेव नेते होते. त्यांनी पिंपळेगुरवला उभे केले. येथे विकासाची गंगा आणली. साधा रस्ताही नव्हता, त्यावेळी येथील जनतेने त्यांना निवडून दिले होते. जनतेचा विश्वास सार्थ ठरवत त्यांनी ३७ वर्षे शहराची सेवा केली. पिंपळेगुरवला त्यांनी कधीही काही कमी पडू दिले नाही. येथील अनेकांना त्यांनी मोठे केले. आज आमची त्यांच्या कुटुंबियांना गरज असताना आम्ही विरोधकांना मतदान करण्याचे स्वप्नात सुद्धा विचार करू शकत नाही. आम्ही एवढे पण कृतघ्न नाही की लक्ष्मणभाऊंनी केलेला पिंपळेगुरवचा विकास एवढ्या लवकर विसरू. आम्ही प्रत्येक मत लक्ष्मणभाऊंच्या विकासाला देऊन त्यांच्या पत्नी अश्विनी जगताप आणि भाजपला एक लाखाच्या मताधिक्याने निवडून देणार असा निर्धार पिंपळेगुरवच्या जनतेने सोमवारी केला.

चिंचवड विधानसभा पोटनिवडणुकीतील भाजप, शिवेसना व मित्र पक्ष महायुतीच्या उमेदवार अश्विनी लक्ष्मण जगताप यांनी पिंपळेगुरवमध्ये पदयात्रा काढून प्रचार केला. तसेच त्यांनी काही भागात कोपरा सभाही घेतल्या. नागरिकांशी संवाद साधून कमळ चिन्हावर मतदान करण्याचे आवाहन त्यांनी केले. पती दिवंगत आमदार लक्ष्मण जगताप यांनी केलेल्या विकासकामांना मत द्या, असेही त्या नागरिकांना म्हणाल्या. यावेळी रिपब्लिकन पक्षाच्या (आठवले गट) राज्याच्या नेत्या चंद्रकांता सोनकांबळे, माजी उपमहापौर नानी घुले, माजी नगरसेवक शशिकांत कदम, सागर आंगोळकर, माजी प्रभाग स्वीकृत सदस्य महेश जगताप, कावेरी जगताप, वैशाली जवळकर, रविना आंगोळकर, दुर्गा आदियाल, पंचशीला दुधारे, अमर आदियाल, राहुल जवळकर, शशिकांत दुधारे, सामाजिक कार्यकर्त्या पल्लवी जगताप यांच्यासह भाजप, शिवसेना व मित्रपक्षाचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित होते.



भाजपच्या अश्विनी लक्ष्मण जगताप यांचे पिंपळेगुरवमध्ये वास्तव्याला आहेत. त्यांचे एकत्रित कुटुंब पिंपळेगुरमध्येच राहते. त्यामुळे पिंपळेगुरवच्या जनतेशी त्यांचे जिव्हाळ्याचे नाते आहे. दिवंगत आमदार लक्ष्मण जगताप यांनी नगरसेवक म्हणून पिंपळेगुरवमधूनच राजकारणाला सुरूवात केली होती. पुढे त्यांनी या भागाचा न भूतो न भविष्यति असा कायापालट केला. या भागाला रस्ताही नव्हता त्यावेळेस ते नगरसेवक म्हणून निवडून आले होते. आता या भागाला चारही बाजूंनी रस्ते जोडले गेले आहेत. पिंपळेगुरवमध्ये प्रशस्त रस्ते, उद्याने, पुरेसे पाणी व इतर मुलभूत सोयीसुविधा उपलब्ध आहेत. त्यांनी या भागाचा कायापालट करत असताना अनेकांना नगरसेवक बनवले. महापौर केले. स्थायी समिती सभापती केले. कित्येक शासकीय कमिट्यांवर अनेकांना संधी दिली.

या पार्श्वभूमीवर त्यांच्या निधनामुळे लागलेल्या पोटनिवडणुकीत त्यांच्या पत्नी अश्विनी लक्ष्मण जगताप यांनी सोमवारी प्रचारानिमित्त संवाद साधल्यानंतर पिंपळेगुरवमधील अनेक लोकांच्या डोळ्यात पाणी आले होते. नागरिकांच्या डोळ्यांतील पाणी पाहून पतीच्या आठवणी दाटून आलेल्या अश्विनी लक्ष्मण जगताप यांनीही डोळ्यातील अश्रूंना वाट मोकळी करून दिली. त्यामुळे प्रचारादरम्यान जागोजागी भावूक वातावरण पाहायला मिळाले. पिंपळेगुरवमधील जनता कुटुंबातीलच सदस्य असल्यामुळे अश्विनी लक्ष्मण जगताप यांनी मनमोकळेपणाने त्यांच्याशी संवाद साधला. नियतीच्या पुढे कोणाचेही चालत नसल्यामुळे माझ्या पतीने केलेल्या विकासकामांमुळे मला मतदान करा, असे आवाहन त्यांनी नागरिकांना केले.

त्यांच्या या आवाहनलाही नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. जगताप कुटुंबावर आणि पिंपळेगुरवकरांवर ही वेळ यायला नको होती, अशा भावना पिंपळेगुरवच्या नागरिकांनी व्यक्त केल्या. ही पोटनिवडणूक बिनविरोध देऊन विरोधी पक्षाच्या नेत्यांनी लक्ष्मणभाऊंच्या कार्याला सलाम करायला हवा होता. पण दुटप्पी वागणाऱ्या या नेत्यांना लक्ष्मणभाऊ कधीच समजणार नाहीत. आता आम्ही त्यांना मतदानातून माणुसकी काय असते आणि लक्ष्मणभाऊ कोण होते, हे समजावून सांगणार असल्याचे पिंपळेगुरवमधील नागरिक अश्विनी लक्ष्मण जगताप यांना सांगत होते. पिंपळेगुरवची जनता कृतघ्न नाही. लक्ष्मणभाऊंनी केलेला विकास एवढ्या लवकर विसरणारे आम्ही नाही. लक्ष्मणभाऊंनी मोठे केलेले आपल्यातले काही जण विरोधकांचा झेंडा घेऊन नाचत असले तरी पिंपळेगुरवमधून शंभर टक्के मतदान भाजप आणि लक्ष्मणभाऊंच्या विकासाला, नेतृत्वाला करणार असल्याचा निर्धार नागरिकांनी केला.

मुख्य *संपादक : राही भिडे, हे दैनिक राजदंड मालक, मुद्रक, प्रकाशक नरेश विठ्ठल देसाई यांनी राणे प्रकाशन प्रा. लि., सर्व्हे नं. १२९, हिस्सा नं. ११ / २ आणि १ / १३, वारजे पुणे - ४११ ०५८ येथे मुद्रित करून न्याती ग्रँडीयर, १०२ ग्रीनविच, कडनगर, उंड्री, पुणे -४११ ०६० येथून प्रकाशित केले. दैनिक राजदंडमधील लेखांचे हक्क राखून ठेवले आहेत. (*पीआरबी कायद्यानुसार जबाबदारी) दूरध्वनी : पुणे (०२०)२६९०९०३१, इमेल-rajdand.pune@gmail.com
या वृत्तपत्रात प्रसिध्द झालेल्या लेख, बातम्या, जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद पुणे न्यायालयीन कक्षेत सोडविले जातील. Declaration No. : SDM/SR/07/2023

# शिक्षण हे वाघिणीचे दूध - उर्मिला सावंत

**म्हसवड : प्रतिनिधी**

शिक्षण हे वाघिणीचे दूध असून यशस्वी जीवनासाठी त्याचा सुयोग्य वापर करा असे आवाहन महाराष्ट्र राज्य सामान्य प्रशासन विभागाच्या अव्वर सचिव सौ. उर्मिला पोपट सावंत यांनी म्हसवड येथे केले.

सौ. उर्मिला सावंत यांना मंत्रालय मुंबई येथे अव्वर सचिवपदी पदोन्नती मिळाल्याबद्दल, डॉ. पोपट सावंत यांना सहाय्यक आयुक्त पशुसंवर्धन पदी पदोन्नती मिळाल्याबद्दल, तर डॉक्टर अदिती सावंत यांची ऑस्ट्रेलिया येथे उच्च शिक्षणासाठी निवड झाल्याबद्दल क्रांतिवीर शैक्षणिक संकुल म्हसवड तर्फे या सर्वांचा सत्कार आयोजित केला होता.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्था अध्यक्ष कृषिरत्न विश्वंभर, संस्था सचिव सुलोचना बाबर, तानाजी कापडे, प्रकाश सावंत इत्यादी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी बोलताना अव्वरसचिव उर्मिला सावंत म्हणाल्या आजची युवा पिढी नशीबवान आहे. बदलत्या परिस्थितीतविद्यार्थ्यांना सर्व सुख सोई उपलब्ध आहेत. मार्गदर्शन सुद्धा योग्य प्रमाणात मिळत आहे. खरी गरज आहे ती



कष्ट करण्याची. यशस्वी जीवनात कष्टाला पर्याय नाही. सध्याच्या जीव घेण्या स्पर्धेत शिकेल तोच टिकेल ही परिस्थिती आहे. चांगलं शिक्षण घेणारा नक्कीच उच्च स्थानावर पोहोचल्याशिवाय राहणार नसल्याचे सावंत यांनी स्पष्ट केले क्रांतिवीर शैक्षणिक संकुलाच्या दूरदृष्टीबद्दल त्यानी कृतज्ञता व्यक्त केली.

यावेळी बोलताना सहाय्यक पशुसंवर्धन आयुक्त डॉक्टर पोपट सावंत म्हणाले गरीबी ही यशस्वी मानवी जीवनातील संघर्षाचा पाया आहे. शालेय जीवनात चांगली संगत धरा,वेळेचे नियोजन करा.भरपूर अभ्यास करून आपल्या गुरुजन व आई-वडिलांचे नाव उज्वल करण्याचे आवाहन डॉक्टर सावंत यांनी केले. टीव्ही व मोबाईल पासून दूर राहा. या सुविधांचा गरजेपुरताच वापर करा.

नियमित अभ्यासाबरोबरच वाचन संस्कृती जोपासण्याचे तसेच खेळात सक्रिय राहण्याचे आवाहन त्यांनी केले. अल्पवधीत क्रांतिवीर शैक्षणिक संकुल यांनी केलेल्या प्रगती बद्दल समाधान व्यक्त करून या संकुलास उज्वल भवितव्य असल्याचे डॉक्टर सावंत यांनी स्पष्ट केले.

सावंत कुटुंबियापासून प्रेरणा घेण्याचे आवाहन संस्था अध्यक्ष कृषिरत्न विश्वंभर बाबर यांनी केले. प्रस्ताविक संस्था सचिव सुलोचना बाबर यांनी केले. यावेळी सावंत कुटुंबीय तसेच संकुलातील शिक्षक, विद्यार्थी उपस्थित होते. सूत्रसंचालन मुख्याध्यापक अनिल कुमार माने यांनी तर उपस्थितांचे आभार उपशिक्षक सागर बाबर यांनी व्यक्त केले.

## कारंडवाडी येथून युवती बेपत्ता

**सातारा :** कारंडवाडी, सातारा येथून युवती बेपत्ता झाल्याची तक्रार सातारा शहर पोलीस ठाण्यात नोंदविण्यात आली आहे.

याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी, दि. १८ फेब्रुवारी रोजी दुपारी साडेबारा वाजण्याच्या सुमारास कारंडवाडी, ता. सातारा येथील २६ वर्षीय युवती राहत्या घरातून कोणास काही एक न सांगता निघून गेली आहे. याबाबतची फिर्याद सातारा शहर पोलीस ठाण्यात नोंदविण्यात आली आहे.

## पाण्यात बुडल्याने वृद्धाचा मृत्यू

**सातारा :** पाण्यात पडून बुडल्याने वृद्धाचा मृत्यू झाल्याची नोंद सातारा शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी, दि. १८ फेब्रुवारी रोजी सकाळी सहा ते साडेनऊ वाजण्याच्या दरम्यान बाबुराव बाळू बरकडे वय ७६, रा. संगम माहुली, ता. सातारा यांचा पाय घसरून ते नदीत पडल्याने पाण्यात बुडून त्यांचा मृत्यू झाला.

# कोरेगाव मतदारसंघाच्या आमदारांनी प्रशासनाच्या माध्यमातून सुरू केलेल्या दडपशाहीच्या विरोधात रस्त्यावर आंदोलन करणार - आ. शशिकांत शिंदे

**कोरेगाव : प्रतिनिधी**

ज्या ज्या ठिकाणी अन्याय झालेला आहे त्या त्या ठिकाणी निर्णय घेतला की नाही जर निर्णय घेतला नसेल तर तर आपल्याला जाब विचारावा लागेल त्यांनी उत्तर देऊ, अथवा न देव, त्यांना आपण मुदत देऊ, एवढ्या मुदतीनंतर जर त्यांनी दखल घेतली नाही तर रस्त्यावर उतरून न्याय मागण्याची तयारी आपण ठेवावी, रस्त्याच्या लढाईत सर्वात प्रथम मी तुमच्यासोबत असेल, मी असा तसा बोलत नाही, जर अति झाले तर मग संघर्ष काय असतो हे शशिकांत शिंदे तुम्हाला दाखवून देईन, असे प्रतिपादन आमदार शशिकांत शिंदे यांनी केले.

कोरेगाव येथील गीते मंगल कार्यालयमध्ये शासन व प्रशासनाच्या माध्यमातून सर्व सामान्य जनतेला पिळवणुकीची भूमिका देण्यात आल्याने दिमाखदार कामगिरीचा कांगावा करणाऱ्या प्रशासनाला खऱ्या अर्थाने जाग आणण्यासाठी गुरुवार दिनांक २३ फेब्रुवारी सकाळी १० वाजता राष्ट्रवादीच्या वतीने सातारा महामार्ग ओव्हर ब्रीज ते जिल्हाधिकारी कार्यालय असा राष्ट्रवादीच्या वतीने महामोर्चाचे आयोजन करण्यासंदर्भात आयोजित केलेल्या बैठकीत ते बोलत होते.

यावेळी कोरेगाव विधानसभा मतदार संघातील सर्व जेष्ठ पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.

आपला माणूस आपला कार्यकर्ता जिवंत ठेवायचा असेल तर दि. २३ फेब्रुवारी रोजीच्या मोर्चातून आपल्याला जिल्ह्याला दाखवून द्यायचे आहे की दबावतंत्राखाली काम करणाऱ्या प्रशासनाला खऱ्या अर्थाने जाग यावी हा प्रमुख उद्देश आहे. फक्त चुकीचा निर्णय घेऊ नये यासाठी आपल्याला हा मोर्चा



यशस्वी करणे तितकेच गरजेचे आहे. कारण या मोर्चातून कोरेगावचेच नव्हे तर संपूर्ण सातारा जिल्ह्याचे राजकारणाला एक दिशा मिळू शकेल. अलीकडे प्रशासन आहे की नाही कळत नाही. वास्तविक प्रशासनाला वाटले पाहिजे की आपण जनतेसाठी आहे. ही लढाई आहे, विरोधी पक्षाची लढाई आपल्यालाच करावी लागेल आणि या लढाईतून एका जरी माणसाला आपण न्याय देऊ शकलो तरी तुमच्या आंदोलन यशस्वी झाले असा निघू शकतो.

कोरेगावचा नगरविकास आराखड्यात पडलेल्या बाधित शेतकरी नागरिकांच्या पाठीशी ठामपणे राष्ट्रवादी पक्ष राहणार म्हणजे राहणार असा मी शब्द देतो. यांनी योग्य तो निर्णय घेतला पाहिजेत, अथवा बाधित शेतकऱ्यांच्या न्याय हक्कासाठी प्रसंगी यांना कोर्टात खेचावे लागले तरी बेहतर त्यात कुठेही कमी पडणार नाही, त्यांच्यावर कारवाई करावी करावी लावणार म्हणजे लावणारच. हा मोर्चा सर्वसामान्य कार्यकर्त्यांच्या आत्मविश्वासाचा असेल हा मोर्चा भविष्य काळामध्ये याच सातारा जिल्ह्यामध्ये चुकीचं काय होणार नाही याच्या संदर्भातला असेल. हा मोर्चा विरोधी पक्ष म्हणून आपला कोणी आवाज दाबणार असेल तर त्याच्या संदर्भातला असेल, हा मोर्चा सातारा जिल्ह्यातल्या सर्वसामान्य माणसाचा असेल. लाईट बिल दाबलं कोण बोलत नाही, शेतकऱ्यांची बिल पटकन टाकून मोकळे होतात, कोण काय बोलतच नाही. तो आवाज आपल्याला उठवायचा आहे. कर्जमाफीचा दुसरा तिसरा हप्ता आला अजून का आपल्याला मिळाला नाही. त्याच्यावर आपल्याला आवाज उठवायचा आहे. हा सर्वसामान्य जनतेवर होणाऱ्या अन्यायाविरोधाचा मोर्चा आहे आणि या सरकारमध्ये गेले सहा महिने कारभार चालला आहे, तो सातारा जिल्ह्यामध्ये चालला आहे, तो यापुढे होऊ नये म्हणून. खऱ्या अर्थाने जागरूक कोण आहे, तर कोरेगाव मतदार संघ आहे, आणि त्यामुळे सातारा जिल्ह्यामधील विरोधी पक्षवार आपण अन्याय करू शकत नाही ही भावना अलीकडे जोरात बळवल्याने आपल्याला खऱ्या अर्थाने हा मोर्चा काढायचा आहे. ही माझी लढाई तुमची माझी लढाई समजून लढूयात, येणाऱ्या काळामध्ये संघर्ष काय असतो सातारा जिल्ह्याला आपण दाखवून देऊयात, आणि हे काम तुम्हा आम्हाला करायचे आहे. मला सुद्धा सार्थ अभिमान वाटला पाहिजे की की मी या सर्वसामान्य कार्यकर्त्यांचा नेता आहे अभिमान वाटावा असे प्रतिपादन आमदार शिंदे यांनी यावेळी केले.

यावेळी शिवाजीराव महाडिक, प्रदीप विधाते, सागर भाऊ साळुंखे श्रीमंत दादा झांझुरणे रमेश उबाळे आदी मान्यवरांनी आपले मनोगत व्यक्त केले.

## पती-पत्नीस मारहाण प्रकरणी चौघांवर गुन्हा; संगमनगर येथील घटना

**सातारा :** पती-पत्नीस मारहाण केल्याप्रकरणी चौघांवर सातारा शहर पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी, दिनांक १८ फेब्रुवारी रोजी ज्वाला रोहित शिंदे आणि त्यांचे पती राहणार संगमनगर, तालुका सातारा हे अजंठा चौक सातारा येथे गेले असता मेरानाम पितांबर शिंदे, उत्तेकर पितांबर शिंदे, अनुसन पितांबर शिंदे, म्हपाबाई पितांबर शिंदे सर्व रा. दत्तनगर, कोडोली, ता. सातारा यांनी ज्वाला शिंदे यांच्या पतीला तू दिलेली केस माघारी घे, असे म्हणत त्या दोघांना मारहाण केली. याप्रकरणी संबंधितांवर सातारा शहर पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

# कुर्डूवाडीची सुलताना शिकलगार समाजातील पहिली 'डॉक्टरेट'

**वडूज : प्रतिनिधी**

सुलताना गफूर शिकलगार यांनी नुकतीच डॉक्टरेट पदवी प्राप्त करून शिकलगार समाजाचे नाव उज्वल केले आहे माढा तालुक्यातील कुर्डूवाडी येथील सुलताना शिकलगार या शिकलगार समाजातील पहिल्याच डॉक्टरेट पदवी प्राप्त केलेल्या महिला असून त्यांच्या या यशाने मुस्लिम समाजातील सर्वच महिलांना शिक्षणाच्या प्रवाहात आणण्यासाठी मार्गदर्शक ठरतील त्या सेंट परीक्षा उत्तीर्ण आहेत.

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर विद्यालय सोलापूर येथे प्राध्यापक डॉक्टर गंगाधर बिराजदार यांचे मार्गदर्शनाखाली त्यांनी हिंदी विषयात डॉक्टरेट पदवी संपादन केली. महाराष्ट्र शिकलगार संघटनेसह सर्व जिल्हा संघटनेने त्यांचे अभिनंदन केले आहे.

त्यांचे प्राथमिक शिक्षण सर्वपल्ली राधाकृष्णन या प्राथमिक शाळेमध्ये झाले. डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर प्रशालेत त्यांनी माध्यमिक शिक्षण पूर्ण केले. महाविद्यालयीन शिक्षण के एन आट्‌र्स अँड कॉमर्स कुर्डूवाडी आणि श्री शिवाजी महाविद्यालय बार्शी येथे पूर्ण केले.आचार्य जावडेकर शिक्षण शास्त्र महाविद्यालय गारगोटी येथे बीएड शिक्षण पूर्ण केले. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर विद्यापीठ सोलापूर येथे त्यांनी हिंदी विषयात पीएचडी पूर्ण केली. सुलताना शिकलगार ह्या सेंट परीक्षा उत्तीर्ण आहेत. त्यांना सामाजिक राजकीय सांस्कृतिक



शैक्षणिक क्षेत्रामध्ये आवड आहे. त्यांनी सांस्कृतिक क्षेत्रामध्ये अनेक विद्यार्थी घडवले आहेत. तसेच विद्यापीठ युवा महोत्सवामध्ये संघ व्यवस्थापकाची भूमिका पार पाडली आहे.त्या श्री शिवाजी विद्यालय बार्शी आणि महाविद्यालय वैराग येथे शैक्षणिक योगदानात कार्यरत आहेत. जिजाऊ महिला प्रतिष्ठानच्या त्या अध्यक्षा असून सम्यक संस्था पुणे चे त्या संचालिका आहेत.

महाराष्ट्रातील मुस्लिम शिकलगार हा समाज भटका समाज म्हणून ओळखला जातो मुळगाव सोडून अनेक कुटुंबे धार लावणे, या कामासाठी महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यामध्ये स्थलांतरित झालेले आहेत. अलीकडील काळात या समाजातील मुले शिक्षण प्रवाहात आलेले आहेत. सध्या मुलांपेक्षा मुलींचा शिक्षणाकडे कल वाढलेला दिसून येत आहे. घरातील आई शिकली तर कुटुंब आदर्श बनते याचा अनुभव सर्वत्र पहावयास मिळत आहे. सुलताना शिकलगार यांच्या डॉक्टरेट बनल्याने समाजातील महिलांना शिक्षणाचे बळ मिळेल हे मात्र निश्चित झाले आहे.

# कष्ट कराल तरंच राजासारखं जगाल – अप्पर पोलीस अधीक्षक बापूसाहेब बांगर

**वडूज : प्रतिनिधी**

सध्याच्या धकाधकीच्या जीवनात अनेकांना कमी श्रमात जास्तीत जास्त इन्स्टंट मनी हवा असतो,सर्वांनाच ते शक्य नसतं,यापेक्षा प्रामाणिक पणे कष्ट कराल तरंच राजासारखं जगाल असं प्रतिपादन जिल्हा अप्पर पोलीस अधीक्षक बापूसाहेब बांगर यांनी वडूज येथील आयोजित कार्यक्रमात केलं.

जिल्हा पोलिस अधीक्षक समीर शेख यांच्या प्रेरणादायी संकल्पनेतून'उंच भरारी' या उपक्रमातून शिक्षण असूनही नोकरी नाही, कमी शिक्षण, प्रतिकूल परिस्थिती,वाईट संगत आदींमुळे मार्ग चुकलेल्या व भरकटलेल्या १५ ते २५ वयोगटातील युवक युवतींना उद्योग, व्यवसाय, नोकरी यासाठी



मार्गदर्शन करण्यात येत असून जिल्हा पोलिस,आय डी बी आय बँक ग्रामीण स्वयंरोजगार प्रशिक्षण संस्था आणि मेधावी स्किल युनिव्हर्सिटी यांच्या संयुक्त विद्यमाने दहिवडी उपविभागीय पोलीस अंतर्गत वडूज येथे मार्गदर्शन शिबीर घेण्यात आले.

यावेळी उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ. निलेश देशमुख, आयडीबीआयचे प्रशांत पाटील, मेधावीचे राकेश कांबळे यांनी युवकांना मार्गदर्शन केले. सहाय्यक पोलीस निरीक्षक मालोजीराव देशमुख यांनी आभार मानले.

कार्यक्रमास औंध पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक दत्तात्रय दराडे, दहिवडी पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलिस निरीक्षक अक्षय सोनवणे, पोलिस अधीक्षक कार्यालयाचे विनोद राजे, संभाजी काटकर, दीपक देवकर, राहूल सरतापे, संदीप शेडगे, सविता वाघमारे आदी पोलीस कर्मचारी, पत्रकार व युवक, पालक उपस्थित होते.

# उंच भरारी योजनेची सातारा जिल्ह्यात सुरुवात

## सातारा जिल्हा पोलिसांचा अभिनव उपक्रम

**सातारा : प्रतिनिधी**

गुन्हेगार बनू पाहणाऱ्या विधी संघर्ष बालक आणि युवकांना गुन्हेगारीपासून प्रवृत्त करणारा उंच भरारी योजना उपक्रम सातारा जिल्हा पोलिसांनी हाती घेतला आहे या उपक्रमाच्या पहिल्या टप्प्यात कौशल्य विकास आणि रोजगार या दोन मुद्द्यांवर भर देण्यात आला असून ही योजना १५ ते २५ वयोगटातील लोकांसाठी राबवली जाणार आहे याची माहिती पोलीस अधीक्षक समीर शेख यांनी दिली आहे.

जिल्हा पोलिसांनी पत्रकात म्हटले आहे की, १६ फेब्रुवारी रोजी उपविभागीय पोलीस अधिकारी गणेश केंद्रे यांच्या अध्यक्षतेखाली कोरेगाव विभागातील कोरेगाव पुसेगाव रहिमतपूर वाठार या पोलीस ठाणे हद्दीतील विधी संघर्ष बालक व युवकांना आयडीबीआय ग्रामीण स्वयंरोजगार प्रशिक्षण संस्था याचे संचालक प्रशांत पाटील यांनी संबंधित युवकांचे व युवतींचे स्वयंरोजगार संदर्भात माहिती देऊन फॉर्म भरून घेतले तसेच मेधावी स्किल युनिव्हर्सिटी च्या माध्यमातून त्यांचे प्रवेश निश्चित करण्यात आले असून राकेश कांबळे यांनी या विद्यापीठाची माहिती दिली या कार्यक्रमास एकूण ७० युवक युवतींनी त्यांच्या पालकांसह सहभाग नोंदवला होता. दिनांक १७ फेब्रुवारी रोजी अपर पोलीस अधीक्षक बापू बांगर यांच्या अध्यक्षतेखाली उपाध्यक्ष निलेश देशमुख यांनी वडूज विभागातील वडूज दहिवडी औंध म्हसवड या पोलीस ठाणे हद्दीतील विधी संघर्ष बालक व युवक युवकांना बोलवून त्यांचे फॉर्म भरून घेण्यात आले. या कार्यक्रमास ६९ युवक युवतीने सहभाग नोंदवला तसेच या फॉर्मचे नियमन करून युवकांच्या आवडीप्रमाणे त्यांना कौशल्य विकास स्वयंरोजगार प्रशिक्षण देण्याचे निश्चित करण्यात आले आहे.

# राज्यस्तरीय क्रिकेट स्पर्धेत सावंतवाडी तर कब्बडी स्पर्धेत तासगाव पालिका विजयी

**महाबळेश्वर : प्रतिनिधी**

महाबळेश्वर नगरपरिषद व महाबळेश्वर नगरपरिषद कर्मचारी वेलफेअर क्लब यांच्यावतीने आयोजित दोन दिवसीय राज्यस्तरीय कबड्डी व क्रिकेट स्पर्धेची पालिका प्रशासक पल्लवी पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत मोठ्या दिमाखात व उत्साहात सांगता झाली.

कब्बडी स्पर्धेत तासगांव नगरपरिषद तसेच क्रिकेट स्पर्धेत सावंतवाडी नगरपरिषदेस प्रशासक पल्लवी पाटील यांच्या हस्ते आकर्षक चषक व रोख रक्कम देऊन गौरविण्यात आले यावेळी माजी नगरसेवक संतोष आबा शिंदे युवा उद्योजक सतीश ओंबळे अर्बन बँकेचे माजी अध्यक्ष सचिन धोत्रे,जावेद वलगे,जेष्ठ कब्बडीपटू मंगेश भिसे महाबळेश्वर ट्रेकर्सचे अध्यक्ष अनिल केळगणे,सचिन गुजर,ताजुद्दीन बागवान विजय साळवी,संतोष यादव कर्मचारी वेलफेअर क्लबचे सचिव आबाजी





ढोबळे,उपाध्यक्ष बबन जाधव यांच्यासह मान्यवर उपस्थित होते विजयी संघाचे प्रशासक पल्लवी पाटील यांनी अभिनंदन केले.

महाबळेश्वर नगरपरिषद व महाबळेश्वर नगरपरिषद कर्मचारी वेलफेअर क्लब यांच्यावतीने व पालिका प्रशासक पल्लवी पाटील यांच्या विशेष सहकार्याने या राज्यस्तरीय कब्बडी व क्रिकेट स्पर्धे चे आयोजन करण्यात आले होते या क्रिकेट स्पर्धेसाठी ६० हुन अधिक तर कबड्डी स्पर्धेसाठी ५५ हुन अधिक संघांची नोंदणी झाली महिलांचे देखील कब्बडीचे संघ सहभागी झाले होते राज्यस्तरीय कबड्डी स्पर्धेचा प्रमुख उदघाटन समारंभ जिल्हाधिकारी रुचेश जयवंशी यांच्या उपस्थितीत झाले या राज्यस्तरीय स्पर्धेचा समारोप बक्षीस वितरण समारंभ पालिका प्रशासक पल्लवी पाटील यांच्यासह मान्यवरांच्या उपस्थितीत झाला पोलो ग्राउंड येथे पार पडलेल्या राज्यस्तरीय क्रिकेट स्पर्धेत प्रथम क्रमांकाचे आकर्षक चषक व पंधरा हजार रोख रक्कमेचे बक्षीस सावंतवाडी नगरपरिषदेने पटकावले,द्वितीय क्रमांकाचे आकर्षक चषक व दहा हजार रुपयांची रोख रक्कमेचे बक्षीस मोहोळ नगरपरिषद तर तृतीय क्रमांकाचे आकर्षक चषक व पाच हजार रुपयांची रोख रक्कमेचे बक्षीस लोणावळा नगरपरिषदेने पटकावले क्रिकेट स्पर्धेत उत्कृष्ट गोलंदाज म्हणून सावंतवाडीचे रिझवान शेख उत्कृष्ट फलंदाज सावंतवाडीचे धनराज नाटेकर तर उत्कृष्ट क्षेत्ररक्षणाचे बक्षीस कार्तिक जाधव मोहोळ याना मिळाला तसेच मालिकावीरचे आकर्षक चषक हे सावंतवाडीच्या निखिल कांबळे याना देण्यात आला.

भव्य कब्बडी स्पर्धा ही पोलीस परेड मैदान येथे संपन्न झाली अंतिम सामना हा महाबळेश्वर नगरपरिषद विरुद्ध तासगाव नगरपरिषद असा रंगला अटीतटीच्या व रोमहर्षक लढतीत २३ विरुद्ध २४ असा झाला केवळ एका गुणाने तासगाव पालिका ही विजयी होत विजेतेपदावर आपले नाव कोरले या कब्बडी स्पर्धेत प्रथम क्रमांकाचे आकर्षक चषक व विस हजार रुपये रोख रक्कमेचे बक्षीस तासगाव नगरपरिषदेने पटकावले द्वितीय क्रमांकाचे आकर्षक चषक व पंधरा हजार रुपयांची रोख रक्कमेचे बक्षीस महाबळेश्वर गिरिस्थान नगरपरिषदेने तर तृतीय क्रमांकाचे आकर्षक चषक व दहा हजार रुपयांचे रोख रक्कमेचे बक्षीस देवरुख पालिकेने पटकावले तर उत्कृष्ट पकड आनंद शिंदे उत्कृष्ट चढाई अविनाश पाटील तर सर्वोत्कृष्ट खेळाडू म्हणून सिद्धार्थ तारळेकर याना विशेष चषक प्रदान करण्यात आला.

महिलांच्या कब्बडी स्पर्धेत प्रथम क्रमांकाचे आकर्षक चषक व अकरा हजर रुपये रोख रक्कमेचे बक्षीस कुळगांव-बदलापूर नगरपरिषद तर द्वितीय क्रमांकाचे आकर्षक चषक व नऊ हजार रुपयांचे बक्षीस महाबळेश्वर पालिकेने पटकावले प्रशासक तथा मुख्याधिकारी पल्लवी पाटील यांच्या हस्ते विजयी संघांसह सहभागी संघाना सहभागाबद्दल देखील विशेष सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले.

# महाराष्ट्रात रूजलेल्या सहकारानेच भारतात सहकाराचा आदर्श घालून दिला - डॉ. सदानंद मोरे

**अकलूज : प्रतिनिधी**

स्वातंत्र्यानंतरच्या काळात जगभरात साम्यवाद आणि भांडवलशाही जोर पकडत असताना महाराष्ट्रामध्ये मात्र सहकार जोर पकडत होता. महाराष्ट्रात रूजलेल्या या सहकारानेच पुढे जाऊन भारतात सहकाराचा आदर्श घालून दिला. परंतु आम्हाला मात्र सहकारात योगदान दिलेल्या व्यक्तींचे योग्य मुल्यमापन करता आले नसल्याचे मत महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळाचे अध्यक्ष डॉ. सदानंद मोरे यांनी व्यक्त केले.

शंकरनगर-अकलूज येथील स्मृती भवन येथे श्री विजय गणेशोत्सव मंडळ पब्लिक ट्रस्ट आयोजित सहकार महर्षि शंकरराव मोहिते-पाटील साहित्य पुरस्कार वितरण समारंभात डॉ. मोरे अध्यक्षस्थानावरून बोलत होते. यावेळी जेष्ठ नेते विजयसिंह मोहिते-पाटील, अच्युत गोडबोले, डॉ. यशवंत पाटणे, डॉ. राजेंद्र दास, आमदार रणजितसिंह मोहिते-पाटील, स्वरूपाराणी मोहिते-पाटील, अर्जुनसिंह मोहिते-पाटील, शिवतेजसिंह मोहिते-पाटील, सत्यप्रभादेवी मोहिते-पाटील, शितलदेवी मोहिते-पाटील, देवन्या मोहिते-पाटील, अ‍ॅड. नितीन खराडे, प्रकाश पाटील, राजेंद्र चौघुले, डा. विश्वनाथ आवाङ, अभयसिंह माने देशमुख, मंडळाचे सर्व ट्रस्टी, विविध संस्थांचे पदाधिकारी उपस्थित होते. यावेळी अच्युत गोडबोले (मुंबई) यांना विशेष साहित्य पुरस्कार, डॉ. यशवंत पाटणे (सातारा) यांना ललित साहित्यकृती पुरस्कार तर डॉ. राजेंद्र दास (कुर्डुवाडी) यांना कविता साहित्यकृती पुरस्कार विजयसिंह मोहिते-पाटील यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला.

डॉ. सदानंद मोरे म्हणाले, सहकार महर्षि




शंकरराव मोहिते-पाटील यांचे सहकारातील योगदान पार मोठे आहे. सहकाराला डावलून जर अर्थव्यवस्थेचा पाया मांडला तर त्याचे दुष्परीणाम आपल्याला भोगावे लागतील. सहकारातील लोकांकडे आपण उद्योगी म्हणून कधीही पाहीले नाही. त्यांचे योग्य मुल्यमापन झाले असते, त्यांच्या विचारांचा सर्वत्र प्रसार झाला असता तर जगाने सहकार स्विकारला असता..

अच्युत गोडबोले म्हणाले, लोक काय म्हणतील या भितीपोटी आपण आपली वागणुक बदलत असतो. हा विचार सोडायला हवा. मराठीमध्ये लिहिणाऱ्या लोकांना कमी प्रतिष्ठा मिळते हे दुर्दैव आहे.

डॉ. यशवंत पाटणे म्हणाले, पुरस्कार मिळाल्याने साहित्यिकांवरची जबाबदारी वाढते. कारण साहित्यीक म्हणून समाज मनावर संस्कार करणे ही आमची जबाबदारी असते. सहकार महर्षि शंकररावांच्या नावाचा हा पुरस्कार म्हणजे कपाळावरील चंदनाचा टिळा असल्यासारखे आहे. सहकार महर्षिंनंतर विजयदादांनीच साहित्यीकांच्या पाठीवर हात ठेवून सतत प्रोत्साहन दिले आहे. कृषी, शिक्षण आणि सहकार हा अकलूजच्या मातीतूनच सर्वत्र पसरला.

यावेळी डॉ. राजेंद्र दास, आमदार राम सातपुते यांनी आपले मनोगत व्यक्त केले तर स्वरूपाराणी मोहिते-पाटील यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक करून पुरस्काराच्या परंपरेची माहिती दिली. शेवटी आभार फातिमा पाटावाला यांनी मानले.

# दावडी विद्यालयामध्ये दहावी व बारावीचा शुभचिंतन सोहळा संपन्न

**राजगुरूनगर : प्रतिनिधी**

रयत शिक्षण संस्थेच्या श्रीमंत महाराजा फत्तेसिंहराव गायकवाड माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय दावडी या प्रशालेमध्ये एच.एस.सी व एस.एस.सी २०२३ वर्गांचा शुभचिंतन सोहळा मोठ्या आनंदात पार पाडला.

कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी विद्यालयाचे स्कूल कमिटीचे सदस्य तुकाराम गाडगे पाटील होते तर प्रमुख पाहुणे म्हणून चाकण कॉलेजचे प्राचार्य राजीव दीक्षित सर, सह्याद्री अकॅडमीचे संचालक रावसाहेब ढेरंगे उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात भाऊराव पाटील, लक्ष्मीबाई पाटील व सरस्वतीच्या प्रतिमापूजनांनी झाली. त्यानंतर विद्यालयातील सांस्कृतिक विभाग प्रमुख श्रीम. वंदना गावडे यांनी प्रास्ताविकेतून कार्यक्रमाचा उद्देश स्पष्ट केला. तदनंतर विद्यालयातील विद्यार्थिनी कु. चैताली लोणकर व कु. सिद्धी जाधव यांनी आपली मनोगते व्यक्त केली. त्यानंतर विद्यालयाचे पर्यवेक्षक सतीश राऊत यांनी विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या.

प्रमुख पाहुणे प्राचार्य राजीव दीक्षित व सह्याद्री अकॅडमीचे संचालक रावसाहेब ढेरंगे यांनी विद्यार्थ्यांना त्यांच्या उज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या व मार्गदर्शन केले.

कार्यक्रमासाठी दावडी गावच्या सरपंच सौ. माधुरी खेसे माजी सरपंच संभाजी आबा घारे माजी सरपंच सौ. राणी डुंबरे ग्रा. पं. सदस्य पुष्पा होरे स्कूल कमिटीचे सदस्य किसनराव दिघे उपस्थित होते.

# शिवजयंतीनिमित्त ऐतिहासिक राजधानी सातारा झाली 'शिवमय'







**सातारा : प्रतिनिधी**

हिंदवी स्वराज्याचे संस्थापक श्रीमंत छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीदिनी रविवारी संपूर्ण ऐतिहासिक सातारा शहर राजधानी ही शिवमय झाल्याचे चित्र पाहायला मिळाले. मागील दोन वर्षे करोना महामारीमुळे यात्रा, जत्रा, मिरवणुका तसेच जयंत्या आणि उत्सव साजऱ्या करण्यासाठी जिल्हा प्रशासनाची अट, नियम आणि बंदी असल्यामुळे थोडीशी मरगळ आली होती. मात्र यावर्षीचा हा शिवजयंती उत्सव मोठ्या उत्साहात आणि जल्लोषात विविध उपक्रम तसेच कार्यक्रमातून सातारा जिल्ह्यात सादर करण्यात आला. शिवजयंती उत्सवानिमित्त सातारा शहर हे भगव्या ध्वज आणि पताकांनी शिवमय झाल्याचे चित्र दिसून येत होते.

१७ फेब्रुवारीपासून शहरातील राजवाडा येथील श्रीमंत छत्रपती प्रतापसिंह विद्यालयात राज्यातील विविध किल्ले, गड, कोट यांची सुरेख छायाचित्रे तसेच ऐतिहासिक शस्त्रे, घरगुती वापरातील वस्तू, युद्ध आणि लढाईतील तलवारी, जम्बिये, सूर्या, चाकू दानपट्टा, चिलखत यांचे प्रदर्शन भरवण्यात आले असून ते २० फेब्रुवारीपर्यंत सुरू राहणार आहे.

दरम्यान, शिवजयंतीच्या पूर्वसंध्येला अजिंक्यतारा किल्ल्यावरून मशाल मिरवणूक काढण्यात आली. साताऱचे विद्यमान आमदार शिवेंद्रसिंहराजे भोसले सातारा जिल्ह्याचे जिल्हा पोलीस प्रमुख समीर शेख आदी मान्यवरांच्या हस्ते या मशाल मिरवणुकीचा प्रारंभ करण्यात आला. तसेच अजिंक्यतारा किल्ल्यावरून लेझर शोचे आयोजन करण्यात आले होते. शहरातील शिवतीर्थ अर्थात शिवाजी सर्कल येथील परिसराला विद्युत रोषणाईची झळाळी देण्यात आली होती. शहरातील सर्वच रस्ते भगवे ध्वज पताकांनी सजवून गेले होते, राजवाडा येथील गांधी मैदानावर भव्य मेघडंबरी उभारून त्यात छत्रपती शिवरायांची सिंहासनावर आरुढ झालेली मूर्ती पूजन करून ठेवण्यात आली होती. शिवजयंतीच्या निमित्त शहरातील विविध तरुण मंडळ तसेच गणेशोत्सव मंडळांनी चौकाचौकात शिवरायांचे भव्य पुतळे, अर्ध पुतळे तसेच सिंहासनावर आणि अश्वारूढ पुतळ्यांची आकर्षक सजावट करून पूजा केली होती. तसेच इतिहास उलगडणाऱ्या शौर्याच्या पोवाडा गीतांची दिवसभर मोठ्या आवाजात प्रसारणे सुरू होती.

सातारा शहरातील यादवगोपाळ पेठेत सुयोग मंगल कार्यालय चौकात भगवान शंकराच्या पार्श्वभूमीवर छत्रपती शिवरायांच्या मूर्तीचे पूजन करण्यात आले होते तर गोल मारुती चौकात तुळजापूरच्या तुळजाभवानी देवीपुढे शिवरायांची अर्ध प्रतिमा पूजेसाठी मांडण्यात आली होती राजपथावरील देवीचौकात फुलांची केलेली आरास विशेष लक्षवेधक ठरत होती तर शुक्रवार पेठेत क्रांती स्मृती विद्यालय चौकात रायरेश्वर मंदिराचा भव्य सजावट देखावा उभारण्यात आला होता. पोवई नाक्यावरील शिवतीर्थाच्या ऐतिहासिक स्थळावर रात्री उशिरापर्यंत मावळ्यांची शिवरायांना अभिवादन करण्यासाठी गर्दी झाली होती. अनेक युवा मंडळांनी जिल्ह्यातील प्रतापगड, अजिंक्यतारा, सज्जनगड, शिवतीर्थ येथून शिवज्योत प्रज्वलित करून ती आपापल्या गावी नेली. शनिवारी रात्रीपासूनच या शिवज्योती ढोल ताशांच्या गजरात वाहनातून जय भवानी जय शिवाजी चा गजर करत कार्यकर्ते आपापल्या गावी नेत होते शिवजयंती निमित्त सातारा शहरातून सायंकाळी ऐतिहासिक भव्य मिरवणूक काढण्यात आली. यामध्ये शिवचरित्रावरील चित्ररथ, देखावे तसेच घोडे, उंट आणि ऐतिहासिक पोशाख परिधान केलेले युवक-युवती मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

महाराष्ट्राचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज यांच्या ३९३ व्या जयंतीनिमित्त सातारा शहरातील ऐतिहासिक वारसा असणाऱ्या शिवतीर्थावर छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त छत्रपती शिवाजी महाराज यांच्या महाशिवआरतीचे आयोजन केले होते. राजवाडा गांधी मैदान सातारा येथून व फुटका तलाव सातारा येथून महिलांची बाईक रॅली आणि दोन्ही बाईक रॅली शिवतीर्थावर पोहचल्यानंतर. सायंकाळी सात वाजता शिवतीर्थावर होणारी महाशिवआरती श्रीमंत छत्रपती राजमाता कल्पनाराजे भोसले यांच्या शुभहस्ते व महिला रणरागिनी यांच्या हस्ते महाशिवआरती करण्यात आली. दिवसभर आपल्या दुचाकी गाड्यांना भव्य भगवे ध्वज बांधून ते फडकावत ऐतिहासिक पोशाखात तसेच युवती नऊवारी साड्या नेसून या दुचाकीवरून रपेट मारताना दिसत होत्या.

## काश्मीरमधील मुलांनी दख्खन जत्रेत लुटला महाराष्ट्रीयन खाद्यपदार्थांचा आनंद...



**पुणे : प्रतिनिधी**

मागील तीन दिवसांपासून आबालवृध्दांसह गर्दीचा उच्चांक मोडणाऱ्या दख्खन जत्रेला आजच्या समारोपाच्या दिवशी काश्मीरमधील मुलांनी भेट दिली.

पुरणपोळी, मिरचीचा खर्डा, पिठलं भाकरी, आणि वांग्याचे भरीत या मराठमोळ्या खाद्यपदार्थांच्या स्टॉलवर या सर्वांनी खाद्यपदार्थांचा मनसोक्त आनंद लुटला. पुणे जिल्हा परिषदेच्या महाराष्ट्र जीवन उन्नती अभियानांतर्गत येथील गोळीबार मैदानावर भरवण्यात आलेल्या या जत्रेमध्ये पुणे विभागातील महिला बचत गटांसाठी १८० स्टॉल उभारण्यात आले. जिल्ह्याच्या कानाकोपऱ्यातून मागील तीन दिवसांपासून नागरिकांची येथे गर्दी होत झाली. पुण्यात शिक्षण घेत असलेल्या काश्मीरमधील २३ विद्यार्थ्यांनी आज या जत्रेला भेट देऊन महाराष्ट्रीयन संस्कृती, कला, मनोरंजन याचा आस्वाद घेत खाद्यपदार्थांचाही आनंद लुटला. शाकाहारी व मांसाहारी खाद्यपदार्थांच्या मेजवानी बरोबरच महिला बचत गटांनी बनवलेल्या विविध सजावटीच्या वस्तू ,वाळवलेले पदार्थ, चटण्या,सॉस याचबरोबर मटन, चिकन व मासे या मासांहारी पदार्थांचे स्टॉल गर्दीने फुललेले असल्याचे आजच्या दिवसाचे चित्र होते.

खासदार सुप्रिया सुळे यांनी चार दिवसांपूर्वी या जत्रेचे उद्घाटन केले होते व महिलांच्या आर्थिक स्वावलंबनाच्या या भरारीचे कौतुक केले होते.

जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आयुष प्रसाद यांच्या मार्गदर्शनाखाली उपायुक्त (विकास) विजय मुळे,जिल्हा ग्रामीण यंत्रणेच्या प्रकल्प संचालिका शालिनी कडू आदी अधिकारी व कर्मचारी वर्गाने मागील चार दिवसांपासून ही दख्खन जत्रा यशस्वी करण्यासाठी परिश्रम घेतले.





## 'जय जय महाराष्ट्र माझा' राज्यगीत अंगिकारण्याचा कार्यक्रम उत्साहात संपन्न

### किल्ले प्रतापगड येथे शिवजयंती उत्सव साजरा

**महाबळेश्वर : प्रतिनिधी**

जिल्हा प्रशासनाच्या वतीने किल्ले प्रतापगड तालुका महाबळेश्वर येथे छत्रपती शिवाजी महाराज जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. याचे औचित्य साधून जय जय महाराष्ट्र माझा हे राज्य गीत अंगिकारण्याचा कार्यक्रम मोठ्या उत्साहात संपन्न झाला.

हा कार्यक्रम जिल्हाधिकारी रुचेश जयवंशी यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाला. याप्रसंगी पोलीस अधीक्षक समीर शेख, जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी महादेव घुले, महाबळेश्वरच्या तहसीलदार सुषमा पाटील, उपमुख्य कार्यकारी अधिकारी अर्चना वाघमळे यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

छत्रपती शिवाजी महाराजांचे कार्य प्रेरणादायी असून या कार्याचा तरुण पिढीने आदर्श घेऊन आपली वाटचाल करावी असे आव्हान जिल्हाधिकारी श्री जयवंशी यांनी केले.

प्रत्येक वर्षी येणारा शिवप्रताप दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात येणार आहे असे सांगून जिल्हाधिकारी श्री जयवंशी म्हणाले, छत्रपती शिवाजी महाराज यांच्या कल्पनेतील देश समाज घडवण्यासाठी प्रत्येकाने प्रयत्नशील राहावे. महाराजांनी दिलेल्या विचारांवर चाललो तर कुठल्याही अडचणी येणार नाहीत. त्यांचे कार्य प्रेरणादायी असून त्यांच्या विचारावरच तरुणांनी वाटचाल करावी असे सांगून शिवजयंतीच्या जिल्हा वासियांना शुभेच्छा दिल्या.

पोलीस अधीक्षक म्हणाले, छत्रपती शिवाजी महाराजांचे विचार, गडकोट, किल्ले, लिहिलेले ग्रंथ, त्यांच्या वास्तू, त्यांनी वापरलेले साहित्य याचे जतन केले पाहिजे. महाराजांचे संपूर्ण आयुष्य आपल्यासाठी शिकवण आहे. त्यांचे विचार ठेवून आयुष्याची वाटचाल केली तर कुठलीही दुविधा निर्माण होणार नाही. त्यांचे विचार प्रत्येकाने जपून त्याचा विस्तार केला पाहिजे असे आव्हानही त्यांनी यावेळी केले.

कार्यक्रमाच्या प्रारंभी पोलीस बँड पथकाने जय जय महाराष्ट्र माझा या राज्यगिताची धून वाजवून छत्रपती शिवाजी महाराजांना मानवंदना दिली.

जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शिक्षण विभागाने यानिमित्त पोवाडा स्पर्धेचे आयोजन केले होते. या स्पर्धेत पारितोषिक पटकावलेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला.

कार्यक्रमास विविध संस्थांचे पदाधिकारी नागरिक विद्यार्थी विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## खासदार उदयनराजेंच्या वाढदिनानिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन



**सातारा : प्रतिनिधी**

छत्रपती शिवाजी महाराजांचे थेट १४ वे वंशज व असंख्य तरुणांचे आशास्थान खासदार उदयनराजे भोसले यांचा वाढदिवस दि. २४ फेब्रुवारी रोजी साजरा होत आहे. यानिमित्ताने दि. २० फेब्रुवारी ते १ मार्च या कालावधीत छत्रपती उदयनराजे मित्रसुमहातर्फे सातारा शहरासह जिल्हाभरात विविध ठिकाणी अनेक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती शिक्षण व अर्थ समितीचे माजी सभापती सुनील काटकर यांनी दिली.

यामध्ये सोमवार दि. २० फेब्रूवारी पासून विविध स्पर्धा सुरु होणार आहेत. यामध्ये २१ रोजी संध्या ७ वाजता बास्केट बॉल स्पर्धा बक्षीस वितरण शिर्के शाळा मैदान सातारा, दि. २१ नेत्र चिकित्सा शिबीर, आकाशवाणी सातारा, दि. २१ नेत्र चिकित्सा शिबीर बस स्टॅण्ड सातारा, दि. २१ फॅशन आयकॉन ऑफ सातारा २०२३ गांधी मैदान, राजवाडा सातारा येथे होणार आहे. तर दि. २२ श्री. छ. उदयनराजे भोसले शरीर सौष्ठव स्पर्धा, गांधी मैदान, राजवाडा सातारा, दि. २३ संध्या ७ वाजता इंडियन आयडॉल फेम रोहित राऊत, जुईली जोगळेकर गाण्यांचा कार्यक्रम, गांधी मैदान, राजवाडा सातारा येथे होणार आहे.

दि. २३ नेत्र चिकित्सा शिबीर, चिंचणेर वंदन, दि. २३ भुमाता युथ फाऊंडेशन भव्य शस्त्रक्रिया सप्ताह, माऊली हॉस्पिटल अँण्ड रिसर्च सेंटर देगांव फाटा, दि. २३ रक्तदान शिबीर, जाखिणवाडी रोड, बचपन शाळेशेजारी, (ता.कराड), दि. २३ संध्या ९ वाजता दादा महाराज चषक क्रिकेट स्पर्धा अंतिम सामना व बक्षीस वितरण समारंभ, शाहू स्टेडियम, सातारा, दि. २४ रिमांड होम, एहसास, पुरुष भिक्षेकरी गृह, जकातवाडी आश्रमशाळा जेवण, सातारा शहर, दि. २४ सकाळी ९ वाजता उसाच्या रसाचे वाटप, सातारा शहर, दि. २४ सिव्हिल हॉस्पिटल रुग्णांना अन्नदान, सिव्हिल हॉस्पिटल, सातारा, दि. २४ महानुभव मठ फळवाटप, तामजाईनगर सातारा येथे होणार आहे.

दि. २४ संध्या ६ वाजता, जल्लोश महाराष्ट्र डान्स चॅम्पियनशिप, हेड पोस्ट ऑफिस शेजारी शनिवार पेठ, कराड, दि. २४ रिक्षा स्टॉप उद्घाटन, कनिष्क मंगल कार्यालयाशेजारी, दि. २४ रिमांड होम, अन्नदान व शालेय वस्तू वाटप, सातारा शहर, दि. २५ डॉग शो, गोडोली, सातारा, दि. २५ संध्या ४ वाजता, नटखट बाल नृत्य स्पर्धा (३ ते ६ वर्षापर्यंत), पेरेंन्टस स्कूल मैदान, गोडोली सातारा आणि दि. १ मार्च रोजी बैलगाडी शर्यत छत्रपती चषक, हजारमाची ओगलेवाडी ता.कराड हे कार्यक्रम होणार असून या कार्यक्रमांचा सर्वांनी लाभ घ्यावा, असे आवाहन छत्रपती उदयनराजे मित्रसमुहाने केले आहे.

### तांब्याच्या तारेची चोरी

**सातारा : प्रतिनिधी**

मारूल हवेली, ता. पाटण गावच्या हद्दीत ट्रान्सफॉर्मर मधील तांब्याच्या तारेची चोरी झाल्याची तक्रार मल्हार पेठ पोलीस ठाण्यात नोंदविण्यात आली आहे.

याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी, दिनांक १७ फेब्रुवारी ते १८ फेब्रुवारी दरम्यान अज्ञात चोरट्याने मारूल हवेली, ता. पाटण गावच्या हद्दीत असणाऱ्या दोघाणी नावाच्या शिवारात असलेल्या ट्रान्सफॉर्मर च्या डीपी स्ट्रक्चरचे साईड चॅनल काढून, तो खाली पाडून, त्यातील ऑइल सांडून ट्रान्सफॉर्मरच्या आतील सुमारे ८० हजाराची तांब्याची तार चोरून नेली आहे. याप्रकरणी अज्ञात चोरट्या विरोधात मल्हार पेठ पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

## हजारो भाविकांनी घेतले स्वयंभू शिवलिंगाचे दर्शन

### सुमारे ७० हजार भाविकांची उपस्थिती



**म्हसवड : प्रतिनिधी**

राज्यातील लाखो भाविकांचे कुलदैवत व म्हसवडचे ग्रामदैवत असलेल्या श्री. सिध्दनाथ मंदिरातील भुयारात असलेल्या स्वयंभू शिवलिंगाचे महाशिवरात्रीच्या रात्री सुमारे ७० हजार भाविकांनी रांगेतून दर्शन घेण्याचा लाभ घेतला.

येथील श्री सिध्दनाथ मंदिरातील भुयारात एक स्वयंभू शिवलिंग आहे. ते वर्षभर बंद अवस्थेत असते वर्षातून फक्त एक वेळ महाशिवरात्रीच्या रात्री रात्रभर तमाम भाविकांच्या दर्शनासाठी खुले ठेवण्यात येते. परंपरागत प्रथेनुसार सर्व धार्मिक विधी उरकून दरवर्षी हे भुयार स्वयंभू शिवलिंगाच्या दर्शनासाठी खुले करण्यात येते.

या परंपरागत चालत आलेल्या पद्धती, रिवाजानुसार सालाबादप्रमाणे श्रींची दैनंदिन रात्रीची आरती संपल्यानंतर रात्री १० वाजता भाविकांना दर्शनासाठी हे भुयार उघडण्यात आले. प्रथम भुयारातील साफसफाई करून परंपरागत प्रथेनुसार स्वयंभू शिवलिंगाला पंचामृत व गरम उदकाने अभ्यंग स्नान घालण्यात आले, नंतर विधीपूर्वक पंचामृताने जलाभिषेक करण्यात आला. मंदिराचे सालकरी गणेश बालघाटे यांच्या हस्ते शिवलिंगास दहीभात पूजा बांधण्यात आली. व आरती झाल्यानंतर दहीभात पूजा उतरविण्यात आली. पुन्हा गरम उदकाने स्वयंभू शिवलिंगास स्नान घालण्यांत आले. त्यानंतर बेल, फुले, आंब्याचा मोहर, चंदन, हळदी, कुंकू, गुलाल, बुक्का, भस्म, अक्षता, श्रीफळ आदी पूजा साहित्य वाहून संकल्प सोडण्यात आला. हा सर्व धार्मिक विधी सालकरी गणेश बालघाटे व त्यांच्या पत्नी यांच्या हस्ते परंपरागत प्रथेनुसार करण्यात आला. सदरचा धार्मिकविधी पिंटू पाठक व प्रजोत पाठक या पुरोहितां मार्फत उरकल्यानंतर स्वयंभू शिवलिंग भाविकांच्या दर्शनासाठी खुले करण्यात आले. रात्री १० वाजता भाविकांच्या रांगेतून दर्शनास प्रारंभ झाला पहाटे साडे ६ वाजेपर्यंत दर्शनरांगेतून सुमारे सत्तर हजार भाविकांनी या स्वयंभू शिवलिंगाच्या/ दर्शनाचा लाभ घेतला. पहाटे साडे ६ वाजता पुन्हा सालकऱ्यांच्या हस्ते शिवलिंगास स्नान घालून संपूर्ण भुयाराची स्वच्छता करून भुयाराचे प्रवेशद्वार बंद करण्यात आले.

दरम्यान चालू वर्षी या भुयारात एक सी.सी.टी.व्ही. कॅमेरा बसवून हत्ती मंडपातील स्क्रीनवर भुयारातील स्वयंभू शिवलिंगाचे दर्शनाचा लाभ असंख्य भाविकांना घेता आले, यामुळे तमाम भाविकांनी समाधान व्यक्त केले. वयोवृद्ध, लहान मुले, प्रकृति ठिक नसणारे भाविक यांना भुयारात जाता येत नसल्याने ते भाविक या स्वयंभू शिवलिंगाच्या दर्शनापासून वंचित राहतात त्यांची सोय झाल्याने यावेळी तमाम भाविकांनी समाधान व्यक्त केले. यावेळी देवस्थान ट्रस्ट व पोलिस स्टेशन यांचेकडून भाविकांच्या सोयीसुविधांसाठी सर्व प्रकारे खबरदारी घेण्यात आली होती.

## ढोलकी कडाडणार, चाळांची छन छन पुन्हा वाजणार... अकलूजला पुन्हा रंगणार लावणी नृत्य स्पर्धा





**अकलूज : प्रतिनिधी**

लावणी नृत्य कलेचे आश्रयदाते म्हणून अकलूजच्या मोहिते-पाटील यांच्याकडे पाहिले जाते. त्यांच्याच राजाश्रयाने गत २६ वर्षांपासून अकलूज येथे दिमाखदार लावणी नृत्य स्पर्धा होत होत्या. पण काही अपरिहार्य कारणांमुळे गेल्या ४ वर्षांपासून या स्पर्धा बंद पडल्या. त्या आता पुन्हा नव्या दमाने आणि जोमाने सुरू करणार असल्याची घोषणा प्रताप क्रीडा मंडळाच्या अध्यक्षा स्वरूपाराणी मोहिते-पाटील यांनी केली.

सहकार महर्षि शंकरराव मोहिते-पाटील जयंती समारंभ समिती व प्रताप क्रीडा मंडळाच्या वतीने दि. १४ ते १६ जानेवारी २०२४ दरम्यान ही राज्यस्तरीय लावणी नृत्य स्पर्धा घेण्यात येणार आहे. या स्पर्धेत सामिल होणाऱ्या सर्व पाट्यांना प्रत्येकी २ लाख रूपयांचे मानधन देण्यात येणार आहे. स्पर्धेत विजेत्या होणाऱ्या पहिल्या क्रमांकाच्या पार्टीला ५ लाख रूपये, द्वितीय क्रमांकाला ३ लाख, तृतीय २ लाख, चतुर्थ १ लाख रूपयांचे घसघशीत बक्षिस देण्यात येणार आहे.

सहकार महर्षि कारखान्याचे अध्यक्ष जयसिंह मोहिते-पाटील व माजी जि. प. अध्यक्ष मदनसिंह मोहिते-पाटील या बंधुंच्या अमृतमहोत्सवी वर्षाच्या वाटचाली निमित्त १ डिसेंबर २०२३ मध्ये त्रिमुर्ती केसरी कुस्ती स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. या स्पर्धेमध्ये राष्ट्रीय पातळीवरील मल्ल सहभागी होतील. विजेत्या प्रथम क्रमांकाच्या मल्लाला अडीच लाख रूपये व चषक, द्वितीय २ लाख, तृतीय दिड लाख, चतुर्थ १ लाख, पाचवा ५० हजार व सहाव्या क्रमांकासाठी २५ हजार रूपयांचे बक्षिस जाहिर करण्यात आले आहे. तसेच इराण, इराक अशा आंतरराष्ट्रीय पातळीवरील मल्लही या स्पर्धेत खेळणार असून त्यांना प्रचंड मोठ्या रकमांची बक्षिसे देण्यात येणार असल्याचे जयसिंह मोहिते-पाटील यांनी जाहिर केले.

यावेळी जेष्ठ नेते विजयसिंह मोहिते-पाटील, जयसिंह मोहिते-पाटील, मदनसिंह मोहिते-पाटील, धैर्यशील मोहिते-पाटील, सयाजीराजे मोहिते-पाटील, सहकार महर्षि कारखान्याचे सर्व संचालक, प्रताप क्रीडा मंडळाचे सर्व सदस्य, यात्रा कमिटीचे सर्व सदस्य उपस्थित होते.

### आदेशाचे उल्लंघन केल्याप्रकरणी एकावर गुन्हा

**सातारा : प्रतिनिधी**

हद्दपार आदेशाचे उल्लंघन केल्याप्रकरणी एकावर कराड शहर पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला आहे. याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी, अर्जुन यशवंत कुंभार याला १९ एप्रिल २०२२ पर्यंत पासून एक वर्षाकरिता सातारा जिल्ह्यातून हद्दपारीचा आदेश झाला आहे. मात्र कुंभार हा १८ फेब्रुवारी रोजी संध्याकाळी सात वाजण्याच्या सुमारास हद्दपार आदेशाचे उल्लंघन करीत कराड शहरात आढळून आला. याप्रकरणी त्याच्यावर कराड शहर पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला आहे. अधिक तपास पोलीस हवालदार माने करीत आहेत.